रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २३६ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in



# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६

किंमत ४₹


## म्हाडाकडून मुंबईतील घरांसाठी लॉटरी

**मुंबई :** म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या अखत्यारीतील विविध वसाहतींमधील १२० सदनिका 'प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यासाठी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज नोंदणीची प्रक्रिया गुरूवारी (दि.५) सकाळी ११ वाजेपासून सुरू होणार आहे. नोंदणी झाल्यानंतर ऑनलाइन अर्ज सादर करणे, अनामत रक्कम भरणे, अर्ज शुल्क भरणा, योजना/सदनिका निश्चिती करणे या प्रक्रियेला गुरूवारी (दि.१२) सकाळी ११ वाजेपासून सुरुवात होणार आहे.



# भाजपकडून हिंदू संस्कृतीला तडा



**। चौल । प्रतिनिधी ।**

■ जयंत पाटील यांचा जोरदार हल्लाबोल

■ आग्राव येथील मविआच्या सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद

संविधानाने दिलेले अधिकार संपवण्याचा प्रयत्न देशात सुरू असून, हिंदू संस्कृती, परंपरा आणि सामाजिक मूल्यांना तडा देण्याचे काम सत्ताधाऱ्यांकडून होत आहे, असा घणाघाती आरोप शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा माजी आमदार जयंत पाटील यांनी केला. अजित पवार यांच्या घरात दुःखाचा प्रसंग असतानाही हिंदू शोकसंस्कृतीची पर्वा न करता दबावतंत्र वापरून शपथविधी घडवून आणण्यात आला, हे हिंदू संस्कृतीला तडा देणारे उदाहरण असल्याचा दावा करत त्यांनी भाजप आणि सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली.

चौल-आग्राव येथे रविवारी (दि.१) महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांची सभा पार पडली. यावेळी जयंत पाटील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत होते. यासभेला शेकापचे ज्येष्ठ नेते सुरेश खोत, नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, बाबू मोरे, पान ५ वर

# खोटी बिले काढणाऱ्यांना घरी बसवा

## शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे आवाहन



(छायाचित्र : समीर मालोदे)

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याचे काम शेकापनेच मंजूर करून घेतले. दुर्दैवाने आमदारकी गेली आणि आपण केलेल्या कामाचे श्रेय टक्केवारी घेणारे घेत आहेत. देवळाच्या कामाची देखील खोटी बिले काढून लुटमार केली जात आहे, असा आरोप शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केला. तसेच, ज्यांना मोठे केले ते खोटे निघाले. लुटमार करून खोटी बिले काढणाऱ्यांना घरी बसवा, असा इशारा देत मोहन धुमाळ व अंजली पाटील यांना भरघोस मतांनी निवडून द्या, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले.

काविर जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार मोहन धुमाळ व रामराज पंचायत समिती मतदार संघातील उमेदवार अंजली पाटील यांच्या प्रचारार्थ रामराज बाजार पेठेत सोमवारी (दि.२ ) सायंकाळी जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जयंत पाटील बोलत होते. यावेळी उमेदवार मोहन धुमाळ, अंजली पाटील, शिवसेनेचे युवा नेते पिंट्या उर्फ अमिर ठाकूर, पंचायत समितीचे माजी सभापती प्रिया वेटकोळी, मधुकर ढेबे, अशोक खोत, विक्रांत वार्डे, गंगाराम शेळके, उपकार खोत, अनंत पाटील, जयवंत तांबडकर, सुरेखा झावरे, आदी शेकाप, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष, महाविकास आघाडीतील पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला वर्ग उपस्थित होता.

यावेळी बोलताना शेकाप सरचिटणीस जयंत पाटील म्हणाले, आजची ही सभा ऐतिहासिक सभा आहे. दिलेला उमेदवार सर्वधर्म समभाव जपणारा कार्यकर्ता आहे. म्हणूनच त्यांना माऊली संबोधले जाते. असे कार्यकर्ते असतील तर पक्ष नक्कीच पुढे जाईल. पक्षासोबत असणारे आणि सोडून जाणारे पुन्हा लालाबावट्याच्या झेंड्याखाली एकत्रित येत असल्याने शेतकरी कामगार पक्षाला गतवैभव प्राप्त होणार असल्याचे शुभ संकेत रामराज परिसरातील घडामोडींमुळे मिळाले आहेत. महिला आघाडीने या निवडणुकीची सूत्रे हाती घेतली आहेत. या निवडणुकीत महिला शक्ती शेकापच्या सोबत उभी असून आपला विजय निश्चित आहे, असे जयंत पाटील म्हणाले.

पुढे बोलताना ते म्हणाले, शेकापने पान ५ वर



### भोनंगमध्ये शिंदे गटाला भगदाड

अलिबाग तालुक्यातील भोनंगमध्ये शिंदे गटात भगदाड पडले आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या कार्य प्रणालीवर खूश होऊन शिंदे गटातील चंद्रकांत शेळके यांच्यासह अनेकांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत रामराज येथे प्रचार सभेच्या दरम्यान हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी चंद्रकांत शेळके यांच्यासह नव निर्वाचित कार्यकर्त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

## वेधक

### रेल्वेतून पडल्याने तरुणाचा मृत्यू

**नागोठणे :** धावत्या रेल्वेतून पडल्याने तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना नागोठणे रेल्वे स्थानकाजवळच असलेल्या निडी येथील रेल्वे रुळाजवळ घडली आहे. या तरुणाचे नाव चंद्रभान चंद्रबली (३०) असे असून, तो उत्तर प्रदेश राज्यातील फुलपूर जमालपूर येथील रहिवासी आहे. हा तरूण एका धावत्या रेल्वेतून तोल जाऊन पडल्याने गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाला असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्याचा मृतदेह येथील गवतात कुजलेल्या स्थितीत आढळून आल्याने त्याचा मृत्यू तीन ते चार दिवसांपूर्वी झाला पान ५ वर

### ट्रेलरखाली चिरडून चालकाचा मृत्यू

**उरण :** धुतुम येथील आयओटीएल कंपनीशेजारील पुलावर ट्रेलरच्या खाली चिरडून चालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. बृजभान मुन्डा यादव (३२) असे या मजुराचे नाव असून, तो मध्य प्रदेशातील भीतरी येथील निवासी होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बृजभान यादव हा रात्री एक वाजण्याच्या सुमारास त्याच्या ताब्यातील ट्रेलर धुतुम येथील आयओटीएल शेजारील पुलावर पनवेलकडे जाणाऱ्या लेनवरील उतारावर थांबवला होता. ट्रेलरचा हँडब्रेक न लावताच खाली उतरून ट्रेलरच्या समोर गेला. तो ट्रेलर भरलेला असल्याने त्याच्या वजनाने उतारावर पान ५ वर

# खोट्या सातबाराप्रकरणी दोघांना अटक

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेणचे उद्योगपती प्रदीप वर्तक आणि त्यांचे सहकारी दत्तात्रेय दांडेकर यांना पेण पोलिसांनी खोट्या सातबाराप्रकरणी अटक केली आहे. त्यांना न्यायालयात हजर केले असता, त्यांना ४ फेंब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाटणोली येथील शेत सर्वे क्र. २२३/०, नवीन नवघर ११२ हेक्टर. आर. जमिनीवर ७० ब नुसार दावा सुरू असताना सूर्यकांत पोशा यांनी या प्रकरणातील चुकीचे दस्तावेज शोधून काढले. त्यामध्ये प्रदीप वर्तक आणि दत्तात्रेय दांडेकर यांनी खोटे शेतकरी असल्याचा पुरावा म्हणून मुंबई येथील वामन रामचंद्र माडये यांच्या नावे पानसई-माणगाव येथील सर्वे नं. १९८/६ या



मिळकतीचे आणि अमोल नारायण कामत यांच्या नावे दासगाव-महाड येथील सर्वे नंबर १३०/आ ३ या मिळकतीचे खोटे साताबारे उतारे सापोली-पेण येथील सर्वे नंबर ६०/० या मिळकतीच्या रजिस्टर खरेदी खत नोंदणी करण्यासाठी वापरल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी सहकार्य केल्यामुळे पेण पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर प्रदीप वर्तक आणि दत्तात्रेय दांडेकर यांना ३१ जानेवारी रोजी पोलिसांनी अटक केली असून, त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. तसेच, पोलिसांकडून या दोघांना न्यायालयाने ४ फेब्रुवारीपर्यंत तपासकामी पोलीस कोठडी सुनावली असल्याचे सांगण्यात आले आहे.

### दोघांना पोलीस कोठडी

पाटणोलीतील एका जमिनीवर दावा सुरू असताना सुर्यकांत पोशा यांनी या चुकीचे दस्ताऐवज शोधून काढले. त्यात प्रदीप वर्तक आणि दत्तात्रेय दांडेकर यांनी खोटे सातबारा सापोली-पेण येथील मिळकतीच्या रजिस्टर खरेदी खत नोंदणी करण्यासाठी वापरल्याचे उघडकीस आले. त्यामुळे दोघांवर गुन्हा दाखल झाला असून ४ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनवावली आहे.

# शेकापमध्ये इनकमिंग सुरुच

## शिंदे गटातील कार्यकर्ते शेकापमध्ये



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शिंदे गटातील असंख्य कार्यकर्ते शेतकरी कामगार पक्षात प्रवेश करीत आहेत. त्यामुळे अनेक गावांमध्ये शिंदे गटाला भगदाड पडत आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून भोनंग येथील शिंदे गटातील गंगाराम शेळके यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी शेकापत प्रवेश केला आहे. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि.१) हा पक्षप्रवेश सोहळा प्रचार सभेवेळी पार पडला.

अलिबाग तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. सर्वसामान्यांना केंद्रबिंदू ठेवून काम करणाऱ्या शेकापमध्ये शिंदे गटातील कार्यकर्ते येत असल्याचे चित्र आहे. भोनंग येथील गंगाराम शेळके यांच्यासह शांताराम शेळके यांनी शिंदे गटातील कार्यकर्ते म्हणून काम केले. परंतु, त्यांना विश्वासात न घेता आमदारांकडून काम केले जात आहे. त्यामुळे आमदारांच्या मनमानी कारभाराला कंटाळून गंगाराम शेळके यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी शिंदे गटाला रामराम ठोकला आहे. अलिबाग तालुक्यातील कावीर जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार मोहन धुमाळ यांच्या प्रचारार्थ भोनंग येथे सभा घेण्यात आली. या सभेदरम्यान गंगाराम शेळके यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शेतकरी पक्षात प्रवेश केला. शेकापमध्ये कार्यकर्त्यांची इन्कमिंग सुरू झाल्याने शिंदे गटाला धडकी भरली आहे.

# खारघरमधील वृद्धाला कोटींचा गंडा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

■ डिजिटल अरेस्टचा बनाव रचून फसवणूक

■ सायबर पोलिसांकडून एकाला अटक

डिजिटल अरेस्टचा बनाव रचून खारघरमधील वृद्धाला तब्बल ४ कोटी ३८ लाख रुपयांचा गंडा घालण्यात आला होता. याप्रकरणी टोळीतील आरोपीला नवी मुंबई सायबर पोलिसांनी अटक केली आहे. अनिलकुमार गुलाबभाई पटेल (३७) असे त्याचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सायबर टोळीने खारघर येथे राहणाऱ्या ८० वर्षीय वृद्धाला डिसेंबर ते जानेवारी या कालावधीत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या नावाचा वापर करून संपर्क साधला होता. तसेच, त्यांच्यावर गंभीर गुन्हा दाखल झाल्यामुळे त्यांना अटक करण्यात येत असल्याची भीती घातली. तसेच, त्यांना क्राईम ब्रँच, आरबीआय, ईडी आणि सुप्रीम कोर्टाची बनावट कागदपत्रे व्हॉट्सअॅपवर पाठवली. त्यानंतर डिजिटल अरेस्टच्या नावाखाली त्यांच्याकडून विविध बँक खात्यांत ४ कोटी ३८ लाख ६२ हजार २१० रुपये भरण्यास भाग पाडले. दरम्यान, या वृद्धाच्या खात्यातून संशयास्पद व्यवहार झाल्याने बँकेने त्यांचे खाते गोठले होते. त्यामुळे त्यांनी बँकेत संपर्क साधल्यानंतर या प्रकरणात त्यांची फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी नवी मुंबई सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यानंतर सायबर पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेल्या बँक खात्यांचे विश्लेषण केले असता संशयित आरोपी अनिलकुमार पटेल हा वलसाड (गुजरात) येथील असल्याचे समोर आले. त्याचा पोलिसांनी तपास सुरू केला असता अनिलकुमार याला मुंबई पोलिसांनी डिजिटल अरेस्टच्या दुसऱ्या गुन्ह्यात आधीच अटक केल्याचे व तो न्यायालयीन कोठडीत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार, नवी मुंबई पोलिसांनी त्याला मुंबई पोलिसांकडून ताब्यात घेतले. यावेळी त्याच्या बँक खात्यात फसवणुकीच्या रकमेपैकी ४० लाख २० हजार रुपये जमा झाल्याचे आढळले आहे. याबाबत अधिक तपास नवी मुंबई सायबर पोलीस करीत आहेत.

## विमानाचा ब्लॅक बॉक्स दिल्लीत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बारामती येथे झालेल्या भीषण विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू झाला होता. आता व्हिटी-एसएसके या विमानाचा ब्लॅक बॉक्स दिल्लीला पोहोचला असून, त्याचे डिकोडिंग एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोकडून केले जाणार आहे. त्यामुळे तपासाला वेग आला आहे. एएआयबी नियमानुसार तपास प्रक्रिया राबवली जात असून, ठराविक कालमर्यादेत तपास पूर्ण करण्याची सरकारची बांधिलकी असल्याचेही संबंधित अधिकाऱ्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, या प्रकरणावर नागरी उड्डाण मंत्रालयाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

# आमदारांची फूस, ठेकेदाराची लूट

■ शिंदे गटाचा कागदावरचा विकास उघड

■ अस्तित्वात नसलेल्या कामांचे लाखो रुपये लुटले

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत सावली हद्दीत असलेल्या मिठागर गावातील भ्रष्टाचार समोर आला आहे. या गावात कागदोपत्री विकासकामे दाखवून लाखो रुपयांची बिले काढत शासनाची प्रचंड फसवणूक झाल्याची धक्कादायक बाब महेश ठाकूर यांनी उघडकीस आणली आहे. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते महेश जानू ठाकूर यांनी २ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे सादर केलेल्या एकाच प्रकारच्या पाच वेगवेगळ्या अर्जांमधून हा पान ५ वर

### कागदावरचे काम गेले कुठे?

**अर्जाच्या शेवटच्या भागात ग्रामस्थांच्या भावना नोंदवत, कागदोपत्री झालेले सभागृह, पाणीपुरवठा आणि स्मशान रस्त्याचे १७ लाखांचे काम प्रत्यक्षात कुठे आहे? असा थेट प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. काम कमी आणि रक्कम जास्त, तसेच जुन्या कामावर थुकपट्टी करून नव्या निधीची बिले काढल्याचा गंभीर आरोप करून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी ठाकूर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.**







### महेश ठाकूर यांचा आरोप काय?

**१) स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण सन २०२१-२२**

**योजना :** डोंगरी विकास कार्यक्रम २०२१-२२.

**अंदाजपत्रकीय रक्कम :** ६,९३,४१६ रु.

**ठेकेदार :** ओंकार चंद्रकांत म्हात्रे.

**आरोप :** या रस्त्याचे ५० टक्के काम आधीच २०१५-१६ मध्ये झाले होते. नव्या योजनेत ७ लाखांच्या कामात फक्त जुना रस्ता सारवासारव करून निकृष्ट काम करण्यात आले. आजही रस्त्याचे ३००-३५० मीटर अंतराचे काम अपूर्ण आहे. तरीही पूर्ण काम झाल्याचे दाखवून संपूर्ण बिल पास करून रक्कम काढण्यात आली आहे.

**२) स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण सन २०२२-२३**

**योजना :** डोंगरी विकास कार्यक्रम २०२२-२३.

**अंदाजपत्रकीय रक्कम :** १० लाख रु.

**ठेकेदार :** अभिषेक वसंत गावडे.

**आरोप :** याच स्मशान रस्त्यासाठी दोन वर्षांत ६.९३ लाख + १० लाख म्हणजे १७ लाख रुपये मंजूर. प्रत्यक्ष रस्ता अंदाजे ३००-३५० मीटर आणि रुंदी ९१० फूट इतकाच असून, तोही पूर्ण झालेला नाही. २०२२-२३ च्या नावाखाली केलेले कामही निकृष्ट व अपूर्ण. रस्त्याजवळ काम पूर्ण झाल्याची पाटी लावून ग्रामस्थांची दिशाभूल.

**३) मिठागर नळपाणी पुरवठा योजना सन २०२१-२२**

**योजना :** ग्रामपंचायत अंतर्गत नळपाणी पुरवठा दुरुस्ती व जी.आय. पाइपलाइन टाकणे.

**अंदाजपत्रकीय रक्कम :** ८ लाख रु.

**निविदा रक्कम** ७,९९,९३० रु.

**ठेकेदार :** निखिल शांताराम बोरकर.

**आरोप :** गावात जी.आय. पाइपलाइन टाकलेलीच दिसत नाही. फाईलमध्ये जोडलेले कामाचे फोटो हे मिठागरचे नसून, इतर ठिकाणचे बनावट फोटो व कागदोपत्री नोंदींच्या आधारावर खोटे बिल पास करून रक्कम काढण्यात आली.

**४) मिठागर सभागृह बांधकाम सन २०२३-२४**

**योजना :** मुलभूत सुविधा २५१५-१२३८ अंतर्गत सभागृह बांधकाम.

**निविदा रक्कम :** ४,९९,९१६ रु.

**ठेकेदार :** स्वप्नील राम लोगडे.

**आरोप :** कागदावर संपूर्ण सभागृह बांधून झाले असे दाखवले, पण प्रत्यक्ष गावात सभागृह अस्तित्वातच नाही. सभागृहाचे नाव घेऊन जवळपास ५ लाखांचे बिल खिशात टाकले.

**५) सामाजिक सभागृह परिसर सुशोभिकरण सन २०२३-२४**

**योजना :** मुलभूत सुविधा २५१५-१२३८ अंतर्गत सुशोभिकरण.

**अंदाजपत्रकीय रक्कम :** ४ लाख रु.

**निविदा रक्कम** ३,९८,३२३ रु.

**ठेकेदार :** सिद्धेश शशिकांत महाडीक.

**आरोप :** सामाजिक सभागृह परिसर सुशोभिकरण या नावाने काम दाखवले; पण प्रत्यक्षात गावात असे कोणतेही काम झाले नाही.

**निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर दुरूस्ती** | **डागडूजीसह रंगरंगोटी व अन्य सुविधांसाठी हालचाली सुरु**

# बंद शाळा पुन्हा उघडणार

**प्रमोद जाधव**

**। रायगड ।**

रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३०४ शाळा पटसंख्येअभावी बंद पडल्या होत्या. या शाळांकडे कोणीही फिरकत नव्हते. परंतु, गेल्या अनेक दिवसांपासून या शाळांच्या डागडूजीसह रंगरंगोटी व अन्य सुविधा उपलब्धध करण्यासाठी हालचाली सुरु झाल्या आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर ७ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. बंद पडलेल्या शाळांची केंद्र म्हणून निवड केली आहे. त्यामुळे या शाळा आता पुन्हा उघडल्या जाणार आहेत.

जिल्हा परिषदेच्या सुमारे अडीच हजारहून अधिक शाळा आहेत. या शाळांमध्ये सुमारे ९६



हजारहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मागील ६ वर्षापुर्वी शासनाने पटसंख्ये अभावी जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला होता. पटसंख्ये अभावी जिल्ह्यातील ३०४ जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करण्यात आल्या आहेत. या शाळेतील विद्यार्थ्यांना अन्य शाळेत पाठविण्यात आले आहेत. त्यामुळे बंद पडलेल्या शाळा ओस पडल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या किलबिलाटला ब्रेक लागला असून शुकशुकाट निर्माण झाला आहे. शाळेच्या खिडक्या, दरवाजे खराब होऊ लागले आहेत.

> **मतदान केंद्र म्हणून बंद पडलेल्या शाळांचाही वापर केला जाणार आहे. वरिष्ठांच्या सुचनेनुसार या शाळा पुन्हा दुरुस्त करण्याच्या सुचना आल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु झाली आहे.**
>
> **- पुनिता गुरव, प्राथमिक शिक्षणाधिकारी, रायगड जिल्हा परिषद**

> **मतदान केंद्रासाठी बंद पडलेल्या शाळांची देखील निवड केली आहे. या शाळांची दुरुस्ती करण्याचे काम सुरु केले आहे. वीज, पाणी व अन्य व्यवस्था करण्यच्या सुचना करण्यात आल्या असून त्या पध्दतीने काम सुरु केले आहे.**
>
> **- राहूल शेळके, उपअभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अलिबाग**

तसेच, शाळेच्या परिसरात गवत वाढू लागले असून भिंतीना तडे पडणे, भिंतीवरील रंग उडणे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

प्रदिर्घ कालावधीनंतर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या पान ५ वर

# धनशक्तीला जनताच धूळ चारणार

**जयंत पाटील यांचा इशारा**

- **नंदकुमार मयेकर यांच्या निवासस्थानी प्रचार सभा**
- **नागावमधील शेकडो कार्यकर्त्यांची सभेला उपस्थिती**





**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत सुशिक्षित आणि तरुण उमेदवार आपण उभे केले आहेत. प्रचारामध्ये तरुणांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. शेकापसह महाविकास आघाडीमधील वेगवेगळ्या गावे, वाड्यांतील तळागाळातील कार्यकर्ता एकरूप झाला आहे. मोठ्या जिद्दीने आणि चिडीने प्रचाराच्या कामाला लागले आहेत. या निवडणुकीत विरोधकांविरोधात प्रचंड नाराजी आहे. त्यामुळे या निवडणुकीत आपल्या पाठीशी जनता आहे, हे स्पष्ट आहे. ही लढाई धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी आहे. या लढाईत धनशक्तीला जनताच धूळ चारणार आहे, अशा विश्वास शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

अलिबाग तालुक्यातील नागाव येथे नंदकुमार मयेकर यांच्या निवासस्थानी प्रचारादम्यान सभेचे आयोजन रविवारी (दि.१) सायंकाळी करण्यात आले. यावेळी जयंत पाटील बोलत होते.

यावेळी चौल जिल्हा परिषद मतदार संघातील शेकाप, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रवादी (शरद पवार गट) काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे, रेवदंडा पंचायत समिती मतदार संघातील शेकाप-महाविकास आघाडीचे उमेदवार राकेश म्हात्रे, नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, नागावचे सदस्य निखिल मयेकर, श्रीकांत आठवले, सुरेश खोत, निलेश खोत, राजू मयेकर, प्रियांका काठे, उपसरपंच मंगला नागे, सुरेंद्र नागलेकर, रोहिनी म्हात्रे, आदेश मोरे आदींसह शेकाप, शिवसेना महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व तरुण उपस्थित होते.

अलिबाग तालुक्यामध्ये महाविकास आघाडीतून निवडणूक लढवित आहोत. महाविकास आघाडीसाठी पोषक वातावरण आहे. प्रचाराच्या दरम्यान कार्यकर्त्यांसह मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. खारेपाटात दहापेक्षा अधिक बैठका झाल्या. या बैठकांमध्ये उत्तम प्रतिसाद मिळाला. निवडणुकीत सुशिक्षित आणि तरुण उमेदवार आपण उभे केले आहेत. प्रचारामध्ये तरुणांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. शेकापसह महाविकास आघाडीमधील वेगवेगळ्या गावे, वाड्यांतील तळागाळातील कार्यकर्ता एकरूप झाला आहे. मोठ्या जिद्दीने आणि चिडीने प्रचाराच्या कामाला लागले आहेत. या निवडणुकीत विरोधकांविरोधात प्रचंड नाराजी आहे. त्यामुळे या निवडणुकीत आपल्या पाठीशी जनता आहे, हे स्पष्ट आहे. धनशक्ती विरुद्ध जनशक्ती ही लढाई आहे. या लढाईत धनशक्तीला जनशक्तीच धूळ चारणार आहे, अशा विश्वास आहे. हिंदुत्वाच्या नावावर मते मागून अंतर्गत वाद निर्माण करण्याचा प्रयत्न काही मंडळी करीत आहेत. हा प्रकार थांबला पाहिजे. त्यासाठी महाविकास आघाडीकडून चौल मतदार संघातील उमेदवार सुरेंद्र म्हात्रे आणि रेवदंडा पंचायत समिती मतदारसंघातील उमेदवार राकेश म्हात्रे यांना उभे केले आहे. महाविकास आघाडीला वातावरण चांगले आहे. गाफील न राहता, योग्य पद्धतीने नियोजन करून बूथ स्तरावर प्रचार करून घरोघरी मतदारांना भेटा, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले.



## भ्रष्ट कारभाराचा लेखाजोखा जनतेसमोर मांडा



- **जयंत पाटील यांच्या कार्यकर्त्यांना सूचना**
- **रेवदंडा येथे शेकापची आढावा बैठक**

**। चौल । प्रतिनिधी ।**

रेवदंडा येथे शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांची आढावा बैठक पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. कार्यकर्त्यांनी एकदिलाने आणि एकजुटीने काम करावे, असे आवाहनही त्यांनी या बैठकीदरम्यान केले. गाफील न राहता घराघरांत जा, मतदारांशी थेट संवाद साधा आणि विरोधकांच्या भ्रष्ट कारभाराचा लेखाजोखा जनतेसमोर मांडा, असेही त्यांनी सांगितले.

शेतकरी कामगार पक्ष रेवदंडा आयोजित आढावा बैठक संतोष मोरे (बाबू मोरे) यांच्या निवासस्थानी रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी रात्री उत्साहात पार पडली. शेकाप-महाविकास आघाडीचे चौल-रेवदंडा-नागाव जिल्हा परिषद मतदारसंघाचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे आणि रेवदंडा-नागाव पंचायत समितीचे उमेदवार राकेश वसंत म्हात्रे यांच्या प्रचारार्थ या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकापचे निष्ठावान कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जयंत पाटील यांनी सांगितले की, मतदारांमधून आघाडीच्या उमेदवारांना वाढता पाठिंबा मिळत आहे. विजय निश्चित असला तरी कार्यकर्त्यांनी निष्काळजीपणा करू नये. आपण केलेल्या विकासकामांची माहिती प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवा. विरोधकांनी विकासकामांच्या नावाखाली कसा भ्रष्टाचार केला, टक्केवारीचे राजकारण कसे राबवले, हे ठोसपणे जनतेसमोर मांडा.

यावेळी जयंत पाटील यांच्यासह जि.प. उमेदवार सुरेंद्र म्हात्रे, पंचायत समितीचे उमेदवार राकेश म्हात्रे, शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते दादा मोरे, हेमंत गणपत, सुरेश खोत, मुझ्झफर मुकादम, सलीम गोंडेकर, संदीप खोत, संतोष मोरे, सोनाली मोरे, खलील तांडेल, रेवदंडा शहराध्यक्ष निलेश खोत आदींसह शेकापचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

या बैठकीचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन शेकाप शहराध्यक्ष निलेश खोत यांनी केले. त्यांनीही मतदारांकडून आघाडीच्या उमेदवारांना वाढता पाठिंबा मिळत असल्याचे सांगितले. मतदार स्वतःहून पुढे येत आहेत. गद्दारी आणि टक्केवारी करून भ्रष्टाचार करणाऱ्यांना गाडण्याचा निर्धार जनतेने केला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, काही उमेदवारांनी स्वतःच्या नेत्यांना फसवून दुसऱ्या पक्षात घुसखोरी करत उमेदवारी मिळवल्याचा आरोप करत त्यांनी टीकास्त्र सोडले. त्यामुळे येथील जनता गद्दारी आणि भ्रष्टाचाराला थारा देणार नाही, असेही ते म्हणाले.



### पालखीला खांदा, खंडोबा महाराजांचे घेतले दर्शन

**माघ पौर्णिमेनिमित्त रेवदंडामधून काढण्यात आलेल्या खंडोबा महाराजांच्या पालखी मिरवणुकीत जयंत पाटील, जि.प. उमेदवार सुरेंद्र म्हात्रे आणि पंचायत समितीचे उमेदवार राकेश म्हात्रे यांनी सहभाग घेत पालखीला खांदा दिला. यावेळी त्यांनी खंडोबा महाराजांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.**




● चौलमध्ये जि.प. उमेदवार सुरेंद्र म्हात्र आणि चौल-वरंडे पंचायत समितीच्या उमेदवार अनया अमित फुंडे यांच्या प्रचारार्थ चौल शितळादेवी येथे शेकाप-महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मतदारांच्या घरोघरी जाऊन प्रचारपत्रकांचे वाटप केले. चौल परिसरात महाविकास आघाडीने प्रचारात आघाडी घेतली असून, मतदारांचाही वाढता पाठिंबा मिळत आहे. यावेळी पंचायत समिती उमेदवार अनया अमित फुंडे, माजी सरपंच रुपाली म्हात्रे, माजी उपसरपंच अजित गुरव, माजी उपसरपंच काशिनाथ घरत, आर.डी. म्हात्रे, प्रशांत वर्तक, आशिष म्हात्रे आदी उपस्थित होते.

# जासईत आघाडीच्या प्रचाराचा जल्लोष

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

जासई जिल्हा परिषद गटाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. मनीष अनंत पाटील व जासई पंचायत गणातील महाविकास आघाडीच्या उमेदवार निर्मला नरेश घरत व चिर्ले पंचायत गणाच्या उमेदवार प्रियांका मढवी यांना जासई मतदारसंघातून मोठ्या प्रमाणात मताधिक्य देणार असल्याचा निर्धार माजी आमदार मनोहर भोईर व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी व्यक्त केला.




यापुढे बोलताना त्यांनी जासई मतदारसंघातील उमेदवार सुशिक्षित आहेत. त्यांच्याकडे विकासाचे व्हिजन आहे. महाविकास आघाडीला चांगला चांगले उमेदवार लाभले असून, आपण सर्वांनी एक होऊन त्यांना जासई मतदार संघातून जास्तीत जास्त मतदान कसे होईल, यासाठी प्रयत्न करावेत. आपल्या उमेदवारांची निशाणी हाताचा पंजा व खटारा असून, या निशाण्या घराघरात पोहोचवा, असे आवाहन केले. प्रचाराला काही दिवस बाकी आहेत. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी दिवस-रात्र एक करून मतदारांपर्यंत पोहोचून आपण केलेल्या विकासकामांची आठवण करून द्या. तसेच पुढील काळात आपण काय करणार आहोत, याबाबतही मतदारांना समजावून सांगा. जासई मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी प्रचारात चांगलीच आघाडी घेतली आहे. विशेष म्हणजे, रविवारी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी निवडणूक प्रचाराची प्रचार पत्रके नागरिकांना वाटप करून, हाताचा पंजा व खटारा चिन्हासमोरील बटण दाबून उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

दरम्यान, तालुक्यातील सोनारी, करळ, सावरखार, धुतुम, जासईसह अनेक गावांध्ये रविवारी उमेदवारांचा प्रचार जोरदार झाला. यावेळी माजी आमदार मनोहर भोईर, काँग्रेसचे महेंद्र घरत, जासई विभाग अध्यक्ष विनोद पाटील, नरेश घरत, प्रेमनाथ ठाकूर, जासईचे सरपंच संतोष घरत, कंठवलीचे जयराम पाटील, भेंड भेंडखळचे दिपक ठाकूर, रोहिदास पाटील, मेघश्याम कडू, दिनेश कडू, दिनेश पाटील, नारायण तांडेल ,किशोर कडू, रमाकांत कडू, दत्ता कडू, कमलाकर पाटील, किशोर कडू, शेखर कडू, अविनाश कडू, प्रवीण कडू, सुनील कडू, विराज कडू, सूचित कडू, प्रमोद पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वासांबे जि.प. गटात संदीप मुंढे चर्चेत

**। आपटा । प्रतिनिधी ।**

वासांबे जिल्हा परिषद गट क्रमांक १६ मधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळ निशाणीवर संदीप सुदाम मुंढे निवडणूक लढवत असून, त्यांना शेकाप, मनसे, शरद पवार गट व काँग्रेसचा पाठिंबा मिळाला आहे. गेली २८ वर्षे सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या मुंढे यांनी मोहपाडा ग्रामपंचायतीत विविध पदांवर काम करत स्थानिक पातळीवर मजबूत जनसंपर्क निर्माण केला आहे. कोरोना काळात मोफत लसीकरण, सॅनिटायझर फवारणी, अन्नधान्य वाटप, तसेच आदिवासी व कामगार बांधवांना मदत केल्याने त्यांची विशेष ओळख निर्माण झाली. परिसरात स्ट्रीट लाईट, हायमॅक्स व सोलर पथदिवे बसविणे, तसेच नेत्रतपासणी शिबिरे आयोजित करून ६७०० रुग्णांची तपासणी व १३५० मोतीबिंदू शस्त्रक्रिया घडवून आणल्याने त्यांचे काम चर्चेत आहे. भाजपच्या नेहा पारंगे यांच्याविरुद्ध मुंढे यांची लढत रंगतदार ठरणार असून, त्यांच्या कामाच्या जोरावर विजय मिळेल, अशी चर्चा मतदारसंघात आहे. संदीप मुंढे यांना जनतेतून वाढता पाठिंबा मिळत असल्याने त्यांचा विजय निश्चित असल्याचा विश्वास व्यक्त होत आहे.

## धाकटीजुई, बोरखारमध्ये आघाडीचा झंझावात



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील जासई जिल्हा परिषद गटातील धाकटीजुई व बोरखारमध्ये काँग्रेस, शिवसेना, शेकाप, राष्ट्रवादी काँग्रेस व मनसे महाविकास आघाडीचे जिल्हा परिषद उमेदवार डॉ. मनिष पाटील व चिर्ले पंचायत गणातील उमेदवार प्रियांका मढवी यांचा झंझावात प्रचार दौरा काढण्यात आला.

या प्रचार दौऱ्यात बी.एम. ठाकूर, रामकृष्ण नवाळे, हसुराम घरत, एकनाथ घरत, प्रकाश जोशी, मयूर पाटील, विलास घरत, शक्ती म्हात्रे, संदेश घरत, नशीब साळवी, दीपक घरत, हसुराम पाटील, संतोष घरत, सनी घरत, पंकज घरत आदी महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विरोधकांच्या टीकेला संजय भोईर यांचे चोख प्रत्युत्तर

**। शिहू । प्रतिनिधी ।**

सध्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले असून, वादे-प्रतिवादे, आरोप-प्रत्यारोपाचे चित्र सर्वत्र दिसत आहे. प्रत्येक उमेदवार आपापल्या मतदार संघात गाव बैठकी, प्रचार फेऱ्या, मतदारांच्या भेटीगाठी घेण्याकडे जास्त भर देत आहेत. अशातच पेण तालुक्यातील शिहू जिल्हा परिषद गट हा प्रतिष्ठेचा समजला जातो. या शिहू जिल्हा परिषद गटातील उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार पल्लवी प्रसाद भोईर व पंचायत समिती उमेदवार संजय धाया भोईर यांचा शिहू, झोतिरपाडा, बेणसे, कुहीरे भागात जोरदार प्रचार करण्यात आला.



झोतिरपाडा येथिल ज्येष्ठ शिवसैनिक जयवंत कुथे यांच्या निवासस्थानी झालेल्या संवाद मेळाव्यात बोलताना पंचायत समिती उमेदवार संजय भोईर यांनी विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला.

विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना संजय भोईर म्हणाले की, माझ्यासारख्या सामान्य माणसावर टीका करण्यात आली की, मी तीनदा निवडणूक लढवली, जरी मी तिसऱ्यांदा निवडणूक लढवत असलो तरी, जनतेच्या आशीर्वादाने याही वेळी मी भरघोस मतांनी निवडून येईन. आमचे कार्य पारदर्शक आहे, त्यामुळे जनतेचा आमच्यावर विश्वास आहे. आम्ही लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत नाही. येणाऱ्या ७ तारखेला जनता तुम्हाला तुमची जागा नक्की दाखवील. मी एक सामान्य माणूस तुम्हाला आव्हान देतो जनतेचा सरपंच किंवा सदस्य होऊन दाखवा, असे चोख प्रत्युत्तर यावेळी बोलताना संजय भोईर यांनी दिले आहे.

या संवाद मेळाव्यात शिवसेना सहसंपर्क प्रमुख प्रसाद भोईर, ज्येष्ठ शिवसैनिक जयवंत कुथे, उपजिल्हा संघटिका दर्शना जवके, माजी जिल्हा संघटिका सुनीता खाडे, लक्ष्मण खाडे, चंद्रकांत अडसूळे, अशोक भोय, मोहन पाटील यांसह शिवसैनिक, महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शेकापच्या अनिल जोशींचा इशारा** | **कळंब जि.प. मतदारसंघात जनतेचा पाठिंबा**

# ‘आयात उमेदवारांचे पार्सल परत पाठवणार’

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाची ताकद काय आहे हे सात जानेवारी रोजी शेकाप कार्यकर्ते दाखवून देणार आहेत. मात्र, कळंब जिल्हा परिषद गटांमध्ये आलेले आयात उमेदवार यांना त्यांची जागा दाखवली जाईल आणि येथील मतदार त्यांचे पार्सल परत पाठवतील, असा विश्वास शेकाप युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष अनिल जोशी यांनी व्यक्त केला. शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेना महायुतीच्या उमेदवारांचे पाषाणे ग्रामपंचायतीमध्ये मोठे स्वागत करण्यात आले, त्यावेळी जोशी बोलत होते.

कळंब जिल्हा परिषद गटांमधील शिवसेना शेकाप भाजप महायुतीचे उमेदवार जिल्हा परिषद गटाचे हरिश्चंद्र निरगुडा आणि पोशिर पंचायत समिती गणाच्या उमेदवार रेश्मा जोशी यांच्या प्रचार फेरीचे पाषाण गावी आयोजन करण्यात आले होते. शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा आणि निशाणी फटारा घेऊन शेकडो कार्यकर्ते या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. पाषाणे गावाचे ग्रामदैवत असलेल्या पांडवकालीन शिव मंदिर येथे या दोन्ही उमेदवार यांनी भगवान शंकराचे दर्शन घेतले. त्यानंतर ग्रामपंचायत तलावामध्ये साकारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे दर्शन घेऊन प्रचाराला सुरुवात केली.



या प्रचार फेरीमध्ये कर्जत पंचायत समितीचे माजी सभापती राहुल विशे, शेकापचे पदाधिकारी आणि जिल्हा बँकेचे माजी संचालक तसेच कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश फराट,शेकाप कार्यालयीन चिटणीस दत्ता राणे, साळोख ग्रामपंचायत सरपंच स्मिता फराट, पोशिर ग्रामपंचायत सरपंच आरती राणे, तसेच साळोख ग्रामपंचायत उपसरपंच मुसा जुवारी, माजी उपसरपंच असीम बुबेरे तसेच माणिवली ग्रामपंचायत माजी सरपंच लहू डायरे, प्रवीण डायरे, प्रमुख कार्यकर्ते महेश शेळके, शिवसेना ठाकरे पक्षाचे विभाग संपर्क प्रमुख रामचंद्र बदे आदी उपस्थित होते.

पाषाणे गावातील प्रचार फेरी मध्ये नंतर शेकाप जिल्हा खजिनदार श्रीराम राणे हे देखील सहभागी झाले.प्रचाराची फेरी मध्ये उमेदवार यांच्याकडून संपूर्ण पाषाण गावातील प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेत होते. याप्रसंगी शेकाप नेते प्रकाश फराट यांनी जिल्हा परिषदेचे दिवंगत सदस्य सुदाम पेमारे यांनी या गटामध्ये आपल्या कार्यकाळात ३३ कोटींची विकास कामे केली होती. शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेना या दोन्ही पक्षाच्या उमेदवार यांच्याकडे विकासाचे व्हिजन आहे, त्यामुळे शेकाप शिवसेना युतीच्या उमेदवार यांचा विजय निश्चित आहे असे मत मांडले.

# एका दगडात किती पक्षी?

अजितदादांच्या अकल्पित मृत्यूनंतर राज्यातील राजकारण नवनवी वळणे घेत चालले आहे. दादांच्या मृत्यूच्या तिसऱ्या दिवशीच त्यांच्या पत्नी सुनेत्राताई यांना घाईघाईने शपथ दिली गेली. उपमुख्यमंत्रिपद हे वैधानिक पद असल्याने ते रिकामे राहू नये असा हास्यास्पद युक्तिवाद भाजपच्या प्रवक्त्यांनी केला. आपण बोलतो म्हणजे ते सत्यच असते असा भाजपचा तोरा असतो. प्रत्यक्षात उपमुख्यमंत्री असे कोणतेही पद घटनेत नाही. सुनेत्रा यांनी तशी शपथ घेणेही बेकायदा आहे. मुख्यमंत्री सोडून सर्व जण मंत्री म्हणूनच शपथ घेतात व त्यामधीलच कोणाला तरी उपमुख्यमंत्री हे शोभेचे पद दिले जाते. त्यामुळे अजितदादा गेल्यामुळे सरकार थांबलेले नव्हते. राष्ट्रवादीच्या गटातही कोणताही वैधानिक पेच निर्माण झालेला नव्हता. सुनेत्रा यांना आणखी दहा दिवसांनी शपथ दिली गेली असती तरीही चालले असते. पण राख सावडण्यालाही न थांबता प्रफुल्ल पटेल, भुजबळ वगैरे लोक मुंबईत आले आणि विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावली गेली व नंतर तीत सुनेत्रा यांची नेता म्हणून निवड केली गेली. आधी असा समज झाला की, पटेल आणि मंडळी डोक्यावर बसायला नकोत म्हणून खालच्या आमदार मंडळींनीच सुनेत्रा यांचे नाव पुढे आणले. पण याच दरम्यान शरद पवार गटाकडून विलीनीकरणाची जी चर्चा सुरू झाली तिला शह देण्यासाठी हे घडवले गेले हे नंतर स्पष्ट झाले. अर्थातच या सर्वांमागे भाजपच्या नेत्यांचा मेंदू व ताकद आहे. किंबहुना, भाजपच्या सल्ल्यानेच प्रत्येक हालचाल चालू असून इथून पुढे अजितदादा गट पूर्णपणे अमित शाह आणि फडणवीसांच्या इशाऱ्यावर नाचत राहील हे आता नक्की झाले आहे. भाजपने सुनेत्रा यांना ताबडतोब बसवून एका दगडात नेमके किती पक्षी मारले आहेत हे कळायलाही काही दिवस लागणार आहेत. एक म्हणजे, अजितदादांच्या निधनानंतर भाजप त्यांच्या कुटुंबाच्या मागे भक्कमपणे उभा असल्याचे नाटक करून त्यांना लोकांची सहानुभूती मिळणार आहे. शिवाय, सुनेत्रा यांना राजकारणाचा व त्याहूनही अधिक म्हणजे सरकार चालवण्याचा शून्य अनुभव असल्याने त्या निदान आरंभी तरी पूर्णपणे देवेंद्र व भाजपवर अवलंबून राहणार आहेत.

## विलीनीकरण आणि दादा

सर्वात महत्वाचे म्हणजे राष्ट्रवादीमधील विलीनीकरणाच्या प्रयत्नांना खीळ बसणार आहे. आता त्या ज्या काय चर्चा वा प्रयत्न होतील ते पूर्णपणे भाजपला फायद्याचे होतील अशाच रीतीने व वेळी होतील. आतापर्यंत जितकी माहिती समोर आली आहे त्यावरून राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांमध्ये विलीनीकरणाची चर्चा बराच काळ चालू होती हे खात्रीलायकरीत्या म्हणता येते. शशिकांत शिंदे, जयंत पाटील हे तर ते सांगत आहेतच. पण खुद्द शरद पवारांनीही ते सांगितले आहे. आजवर त्यांनी भाजपसोबत युतीला कसून विरोध केला. त्यापायी अजितदादांना दोनदा तोंडघशी पाडले. पहाटेचा शपथविधी केला तेव्हा अजितदादांना एकटे पाडले आणि नाईलाजाने महाविकास आघाडीत परत यावे लागले. पण आज तेच शरद पवार विलीनीकरण व्हावे ही अजितदादांचीच इच्छा होती व त्याच्या तारखाही ठरत आल्या होत्या असे सांगू लागले आहेत. पवार इतके हतबल आयुष्यात कधीही झाले नसावेत. भाजपला म्हणजेच अमित शाह त्यांची सर्व विश्वासार्हता व प्रतिष्ठा खलास करण्याची ही नामी संधी वाटत असेल तर नवल नाही. त्यामुळेच आता विलीनीकरणाचा हा खेळ लांबवला जाणार आहे. शरद पवार गटाला नाक घासायला लावायचे, त्यांच्यात फूट पाडता आली तर पाहायचे, कार्यकर्त्यांना पवारांविषयी कोणतेही प्रेम वा निष्ठा उरलेली नाही हे दाखवायचे असे अनेक प्रकार आता केले जातील. दरम्यान, विलीनीकरण ही दादांची भावनिक गरज होती. शरद पवार यांना आपण दुःख दिले ते आपणच दूर करायला हवे असे त्यांना वाटत होते असे दिसते. शिवाय भाजपला शह द्यायचा तर आपली ताकद विभागलेली असून चालणार नाही हे त्यांच्या लक्षात आले होते. नगरपालिका व महापालिका निवडणुकांमध्ये त्यांना जो फटका बसला होता त्यानंतर ते याबाबत अधिक घाई करीत होते. जिल्हा परिषदांना दोन्ही गटांना एक करण्यात त्यांचा पुढाकार होता. शिवाय सत्तेत असल्याने विलीनीकरण त्यांच्या अटीशर्तीवर होणार होते.

## अस्तनीतले साप

अजितदादा सोडून इतर नेते याबाबत इतके उत्सुक नाहीत हे स्वाभाविक आहे. ते फक्त सध्यापुरते पाहत आहेत. या घडीला शरद पवार गट आपल्यात येणार म्हणजे सत्तेत आणखी एक भागीदार येणार इतकेच त्यांना दिसते आहे. आपली काही मंत्रिपदे शरद पवार गटाला द्यावी लागतील याचे त्यांना दुःख आहे. शिवाय अजितदादांच्या माघारी पक्ष सुनेत्राताईंना पुढे करून पक्ष आपल्याला कह्यात ठेवता येईल अशी स्वप्ने ते पाहत आहेत. विलीनीकरण मान्य करणे म्हणजे पुन्हा शरद पवार यांची ताबेदारी स्वीकारणे. ते यांना नको आहे. वास्तविक याच पवारांनी या सर्वांना राजकारणात आणले. मोठे केले. पदे दिली. ताकद दिली. पण आज हे सर्व त्याच पवारांवर उलटले आहेत. अर्थात यांच्या कृतघ्नतेचा अनुभव सर्वदूर सर्वांनी घेतला आहे. रायगडमध्येही लोकांनी ते पाहिले आहे. मढ्याच्या टाळूवरचे लोणी खाण्याची यांची प्रवृत्ती जवळून पाहिली आहे. ज्यांनी ज्यांनी यांना मदत केली त्यांच्यावरच हे कायम उलटले आहेत. खुद्द पवारांना या वयात, प्रकृती फार ठीक नसताना आणि सख्ख्या पुतण्याचे निधन झालेल्या स्थितीत या असल्या उलट्या काळजाच्या माजी सहकाऱ्यांकडून अशी वागणूक मिळत आहे. महाराष्ट्राचे राजकारण इतक्या खालच्या थराला कधीही गेले नसावे. आज भाजपवाले यांना मागून फूस देत आहेत. त्यामुळे यांना आपण सर्वशक्तीमान आहोत असा भास बहुदा होत आहे. पण भाजप यांना कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे नाचवत आहे आणि यांचा उपयोग संपला की यांनाही एक दिवस फेकून देणार आहे हे यांच्या लक्षात येत नाही. भाजपला महाराष्ट्रात शंभर टक्के यश मिळवण्यामध्ये पवारांनी उभे केलेले सहकारी चळवळीचे जाळे हा मोठा अडसर वाटतो. सहकारातले इतके नेते फोडूनही भाजपला आपल्या ताकदीचा भरवसा वाटत नाही. त्यासाठीच तर एकनाथ शिंदे सोबत असूनही त्यांनी राष्ट्रवादी फोडली व अजितदादांना बरोबर घेतले. शिंदेंना शह देणे हा त्यातला केवळ एक भाग होता. पण मुख्य उद्देश हा पवारांच्या प्रभावक्षेत्रातून भविष्यात होऊ शकणारा विरोध नष्ट करणे हाच होता. पण पवार हे सहजासहजी आपल्याला वश होणारे नाहीत हे भाजपला दिसत होते. अगदी अजितदादा हे युतीत असूनही पुणे व पिंपरी चिंचवडच्या निवडणुकीत भाजपला भिडले होते. भाजपवर त्यांनी भ्रष्टाचाराचे थेट आरोप केले होते. आता जिल्हा परिषदांमध्येही निदान पश्चिम महाराष्ट्रातल्या जिल्ह्यांमध्ये तरी भाजप विरुध्द अजितदादा अशीच लढत होणार होती. त्यामुळेच आता संधी साधून त्यांनी सुनेत्रांची निवड करून पवार कुटुंबामध्येच मोठी फूट पडेल अशी व्यवस्था करून ठेवली आहे.

विचार

# विमानतळ बाजारपेठेला नवे धुमारे

*विमानतळांना विमान प्रवाशी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांकडून मिळणाऱ्या महसुलातूनच उत्पन्न मिळत होते. विमान थांब्याचे भाडेही उत्पन्नाचे एक साधन होते; परंतु आता वाढीचा पुढील टप्पा अधिक विमानसेवा पुरवण्याने नव्हे, तर अधिक हुशारीने विक्री करण्याने येणार आहे. भारताच्या नवीन विमान वाहतूक अर्थव्यवस्थेत आकाश ही आता मर्यादा राहिलेली नाही. तीच आता एक बाजारपेठ बनली आहे.*



प्रा. सुखदेव बखळे

भारतातील विमानतळांसाठी सीट अपग्रेड आणि लाउंजसह पूरक उत्पन्न आता नफ्याचे एक प्रमुख साधन बनले आहे. ते विमानतळांना चैतन्यपूर्ण ग्राहक केंद्रांमध्ये रूपांतरित करत आहे आणि हवाई प्रवासाचे भविष्य नव्याने परिभाषित करत आहे. आता तुम्ही दिल्ली विमानतळाच्या टर्मिनल तीनवर असाल, तर उशीर होण्याचे कारण कदाचित डिपार्चर गेट नसेल, तर नवीन शनेल बुटीक असेल. हैदराबादमध्ये विमानात चढण्यापूर्वी गॉर्डन रॅमसे बर्गर खाण्याचा मोह होऊ शकतो. संपूर्ण भारतात याच पद्धतीने विमानप्रवासाची नव्याने आखणी केली जात आहे. आता विमानप्रवास केवळ गंतव्यस्थानी पोहोचण्यापुरता मर्यादित नाही; तर प्रवासी मधल्या वेळेत तास कसे घालवतात, यालाही महत्त्व आले आहे आणि याच ठिकाणी एअरलाइन्स कंपन्या आणि विमानतळ प्रशासन कमाईच्या नव्या संधी शोधत आहेत. भारताच्या विमान वाहतूक उद्योगासाठी आता आकाशात नाही, तर जमिनीवर सर्वात महत्त्वपूर्ण वाढ होत आहे. नॉन-तिकिट आणि गैर-विमानचालन महसूल प्रवाह हे या क्षेत्राचे सर्वात मजबूत वाढीचे इंजिन बनले आहेत. तिकिट विक्रीमुळे प्रवासी येतात; परंतु सीट अपग्रेड, लाउंज, प्रीमियम जेवण, जाहिरात, ब्रँडेड किरकोळ विक्री आणि विशेष अनुभव यासारख्या अतिरिक्त सेवांमुळे नफ्याचे प्रमाण वाढत आहे. एअरलाइन्स आणि विमानतळ चालक या उच्च-नफ्याच्या प्रवाहावर मोठी खेळी करत आहेत. महसूल निर्मितीच्या पद्धतीत ही खेळी एक स्पष्ट बदल दर्शवत आहे. जागतिक स्तरावर विमान वाहतूक उद्योगाच्या नफ्यासाठी पूरक महसूल दीर्घकाळापासून महत्वाचा मानला जात आहे.

आजघडीला हिथ्रो, चांगी आणि दुबईसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय विमानतळांवर ४० ते ५० टक्के महसूल नॉन-तिकिट स्रोतांमधून येतो. भारतही यात मागे नाही. विमानतळ आणि एअरलाइनच्या उत्पन्नात पूरक सेवांचे योगदान २५ ते ३५ टक्के आहे. उद्योग अंदाजांनुसार, डिजिटायझेशन आणि प्रीमियम अनुभवांची वाढती मागणी या बदलाला गती देत आहे. प्रवाशांची संख्या वाढत असतानाही भाड्याचे मार्जिन मोठ्या प्रमाणात स्थिर राहिल्याने विमान कंपन्या सीट विक्रीपलीकडे जाऊन नवनवीन प्रयोग करत आहेत. सोयी, निवड आणि अनुभवाचे मुद्रीकरण पुढील दशकाची व्याख्या करेल. ॲप्स, डायनॅमिक प्राइसिंग आणि ऑफर्समुळे एअरलाइन्स आणि विमानतळांना प्रवाशांच्या खर्चाचा मोठा वाटा मिळवणे शक्य होते. त्याच वेळी त्यांना वैयक्तिकृत सेवाही देता येतात. भारतात हा बदल दोन पातळ्यांवर होत आहे. विविध एअरलाइन्स तिकिटविक्रीपलिकडे जाऊन आपल्या सेवांचे जाळे सर्व्हिस इकोसिस्टीममध्ये रूपांतरीत करत असून विमानतळे रिटेल विक्री, खानपान सेवा आणि मीडिया यांचे हब बनत आहेत. 'एअर इंडिया'मध्ये टाटा समूह करत असलेला कायापालट नवी विमाने आणि नवीन ब्रँडिंगपुरता मर्यादित नाही. ही एअरलाइन कंपनी प्रवाशांच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यातून कमाई करण्यासाठी एक मजबूत पूरक सेवा पोर्टफोलिओ तयार करत आहे. पूरक महसूल आर्थिक वर्ष २०२४ मधील १,७०० कोटी रुपयांवरून आर्थिक वर्ष २०२५ मध्ये २,५०० कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे.

२०२७ पर्यंत ही विमान कंपनी 'अपग्रेड प्लस,' 'सीट अपग्रेड', अतिरिक्त सामान, भाडे लॉक, प्रवास विमा, गिफ्ट कार्डस आणि 'व्हीएफएस ग्लोबल'च्या 'वनवास्को व्हिसा कॉन्सियरज'सारख्या सेवांद्वारे हा महसूल तिप्पट करण्याचे लक्ष्य ठेवत आहे. प्रवाशांना 'फ्लाय प्रायर' सारख्या सेवा आवडत आहेत. त्यामुळे जादा शुल्क देऊन त्याच दिवशी फ्लाइट बदलता येते. 'झिपअहेड'द्वारे प्राधान्य चेक-इन, टॅक्सी बुकिंगसाठी टाय-अप आणि टाटा एआयजी प्रवास विमा यांसारख्या इतर सेवा सोयीचे रूपांतर महसुलात करण्यासाठी डिझाइन केल्या आहेत. 'सीट निवडण्यापासून टॅक्सी बुकिंगपर्यंत प्रत्येक उत्पादन, ब्रँडला प्रवाशांच्या निर्णय प्रक्रियेत टिकवून ठेवते', असे एका एअरलाइन अधिकाऱ्याने सांगितले. 'इंडिगो'चा मोठ्या प्रमाणावरील फायदा दर्शवतो, की पूरक महसूल वाढ किती दूर जाऊ शकते. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये मालवाहतूक, अतिरिक्त सामान आणि सीट निवडीमुळे त्याचा पूरक महसूल २०.७ टक्क्यांनी वाढून सात हजार ९४४ कोटी रुपयांवर पोहोचला. आर्थिक वर्ष २०२५ च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये 'इंडिगो'ने २१ हजार ४११ कोटी रुपयांचे पूरक उत्पन्न नोंदवले. मागील वर्षाच्या तुलनेत ही वाढ १४.२ टक्के इतकी होती आणि ती तिकीट महसूलवाढीपेक्षा जास्त होती. 'लाउंज ॲक्सेस', प्राधान्य बोर्डिंग, प्रवास विमा आणि ६ई रिवार्डस रिडिम्प्शन हे 'इंडिगो'च्या कमी किमतीच्या विमान कंपनीकडून जीवनशैली ब्रँडमध्ये होणारा बदल अधोरेखित करतात. पूरक सेवा आता दुय्यम व्यवसाय राहिलेल्या नाहीत. त्या नफ्याचे मुख्य इंजिन आहेत. सध्या खासगी विमानतळे एअरलाइन्सच्या धोरणाचे अनुकरण करत आहेत. गैर-विमानचालन महसूल आता त्यांच्या व्यवसाय मॉडेलचा केंद्रबिंदू बनला आहे. दिल्ली आणि हैदराबाद विमानतळांचे संचालन करणाऱ्या जीएमआर एअरपोर्टसमध्ये गैरविमान वाहतूक (नॉन-एरो) उत्पन्न आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील ४३ टक्क्यांवरून आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ४७ टक्क्यांपर्यंत वाढले आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत १३ टक्क्यांनी वाढले. किरकोळ विक्री, ड्युटी-फ्री उत्पादनांची विक्री, खाद्य आणि पेय (एफ अँड बी) आणि इतर सेवा या वाढीमध्ये आघाडीवर आहेत. 'भारताचे विमान वाहतूक क्षेत्र विस्ताराच्या नवीन टप्प्यात प्रवेश करत असताना आम्हाला प्रवासी वाढ आणि खर्च या दोन्हीला चालना देणारे मजबूत अनुकूल घटक दिसत आहेत,' असे 'जीएमआर एअरपोर्टस'चे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (वाणिज्य आणि विकास) राजेश अरोरा यांनी सांगितले. आम्ही केवळ पायाभूत सुविधांचे संचालक या भूमिकेतून विकसित होऊन एक वैविध्यपूर्ण ग्राहक मंच बनलो आहोत आणि विमानतळांना मूल्य प्रदान करणाऱ्या गंतव्यस्थानांमध्ये रूपांतरित केले आहे, असे ते म्हणाले. आठ विमानतळांचे संचालन करणाऱ्या 'अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड'ने (एएएचएल) आर्थिक वर्ष २०२५ मध्ये गैरविमान वाहतूक महसुलातून चार हजार ९२६ कोटी कमावले. हे उत्पन्न 'अदानी एअरपोर्टस'च्या एकूण उत्पन्नाच्या जवळपास निम्मे आहे.


एप्रिल मून रिटेल आणि मुंबई ट्रॅव्हल रिटेलसारख्या उपकंपन्या विस्तारणाऱ्या इन-हाऊस किरकोळ विक्री मॉडेलला चालना देत आहेत. अदानी समूह विविध टप्प्यांमधील शहरस्तरीय प्रकल्पांमध्ये चार अब्ज डॉलर्सची (सुमारे ३३ हजार कोटी रुपये) गुंतवणूक करत आहे. त्यापैकी जवळपास ७० टक्के रक्कम मुंबई आणि नवी मुंबई विमानतळांसाठी राखून ठेवण्यात आली आहे. यामध्ये प्रवासी, कर्मचारी आणि शहरातील ग्राहकांना सेवा देणाऱ्या वैयक्तिकृत, डेटा-आधारित किरकोळ व्यवसायावर भर दिला जात आहे. 'आम्ही संपूर्ण विमानतळ व्यवसायाचा ताबा घेण्याची आणि सर्व किरकोळ व्यवसाय स्वतःच चालवण्याची योजना आखत आहोत', असे 'अदानी एअरपोर्ट'चे सीईओ गौरव सिंग यांनी सांगितले. ही कंपनी पुढील वर्षापर्यंत आपल्या सर्व विमानतळांवरील स्वतःच्या ब्रँडच्या ५० स्टोअर्सवरून ३०० हून अधिक स्टोअर्सपर्यंत विस्तार करत आहे. त्यात २७० किरकोळ आणि ४० फूड अँड बेव्हरेज आउटलेट्सचा समावेश आहे. बंगळुरूचे केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळ चालवणाऱ्या 'बंगळुरू इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड' (बीआयएएल) साठी महसुलाच्या ३५ टक्के वाटा 'नॉन-एरो' व्यवसायातून येतो. त्यात 'एफ अँड बी' लाउंज, किरकोळ विक्री, ड्युटी-फ्री उत्पादनांची विक्री आणि जाहिरातींचा समावेश आहे. कंपनी पुढील पाच वर्षांमध्ये आपल्या किरकोळ व्यवसायाचा विस्तार ४० हजार चौरस मीटरवरून एक लाख चौरस मीटरपर्यंत वाढवण्याची आणि ५०० हून अधिक ब्रँड्स जोडण्याची योजना आखत आहे.

**(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

# ऑनलाईन व्यवहार करताना जपून

रोखीत आर्थिक व्यवहार कालबाह्य होण्याच्या मार्गावर असून आता ऑनलाईन आर्थिक व्यवहारावर अधिक भर दिला जात आहे. फुल विक्रेत्यांपासून लहान मोठ्या उद्योग व्यवसायापर्यंत ऑनलाईन खरेदी केली जात आहे. मोबाईलच्या एका क्लीकवर पैशांची देवाण घेवाण होत आहे. त्यामुळे जिल्ह्यामध्ये ८० टक्केपेक्षा अधिक नागरिक ऑनलाईन आर्थिक व्यवहार करीत असल्याचे चित्र आहे. जिल्हा डिजीटलच्या जगतामध्ये जगत असताना सायबर गुन्हेगारीदेखील प्रचंड वाढत आहे. वेगवेगळ्या कारणावरून ऑनलाईन आर्थिक फसवूक होत असल्याची समस्या गंभीर झाली आहे. ही रोखण्यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. मात्र ही सायबर गुन्हेगारी सर्वसामान्यांसाठी एक डोकेदुखी बनत आहे.

यापुर्वी सर्व आर्थिक व्यवहार रोखीतसुरु होते. बदलत्या राहणीमानानुसार हळुहळू कॅशलेश व्यवहारावर भर दिला जात आहे. रायगड जिल्ह्यामध्ये डिजीटल पध्दतीने आर्थिक व्यवहार सुरु झाले आहेत. जिल्ह्यामध्ये लॉकडाऊनमुळे ऑनलाईन व्यवहाराला प्राधान्य देण्यात आले होते. घरबसल्या वेगवेगळ्या खाद्य पदार्थांसह वस्तूंची मागणी ऑनलाईनद्वारे करण्यात आली होती. त्यात भाजीपाल्यासह दुध अशा अनेक खाद्य पदार्थ व वस्तू डिजीटल व्यवहारातून मागविल्या जात होत्या. मागील पाच वर्षापासून सुरु झालेल्या या डिजीटल व्यवहाराला शहरी भागासह ग्रामीण भागातही पसंती दर्शविली जात आहे. सध्या डिजीटल व्यवहाराचा क्रेझ वाढत आहे. कॅशलेस व्यवहाराला नागरिकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. वेगवेगळ्या बँका, पतसंस्था, कंपन्यांनी त्यांचे स्वतंत्र ॲप तयार केले आहेत. या ॲपद्वारे घरात बसून मोबाईलवरून वस्तू खरेदीपासून आर्थिक व्यवहार डिजीटल पध्दतीने होऊ लागले आहेत. खिशात रोख रक्कम ठेवण्याचे प्रमाण कमी झाले आहे. वेगवेगळ्या ॲपने पैसे पाठविणे,



पैसे स्विकारण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे रोखीत व्यवहार आता कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहे.कॅशलेस व्यवहार वाढू लागला

प्रमोद जाधव

आहे. विशेष करून तरुण वर्गामध्ये याबाबत जनजागृती निर्माण झाली आहे. सर्वच आर्थिक व्यवहार मोबाईलद्वारेच होत आहेत. बँकेत येण्यापासून ते एटीएममध्ये जाण्यापर्यंतचे प्रमाणही कमी झाले आहे. आता घरी बसून मोबाईलच्या एका क्लीकवर आर्थिक व्यवहार केले जात आहेत. पुर्वी दरोडा टाकून लुटमार केली जात होती. परंतु बदलत्या परिस्थितीनुसार गुन्हेगारीचे स्वरुपही दिवसेंदिवस बदलू लागले आहे. सध्या डिजिटल संकल्पनेतून सुरू झालेले कॅशलेस व्यवहार आणि सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे ऑनलाईन गुन्हे वाढू लागले आहेत. ओळख लपवून इंटरनेटवर गंभीर गुन्हे सहज करता येतात. पासवर्ड हॅक, ऑनलाईन बँकिंग आणि जॉब फ्रॉड, लॉटरी, एटीएम स्कीमिंग, नायजेरियन फ्रॉडसारखे ऑनलाइन आर्थिक फसवणुकीचे गुन्हे, सोशल मिडीयाच्या माध्यमातून देव-देवता, महापुरुषांचे विडंबन, महिलांचे बनावट प्रोफाइल तयार करणे, अश्लिल फोटो वेबसाइटवर टाकणे, ऑनलाईन पध्दतीने बँक खात्यातील परस्पर रोख रक्कम लंपास करणे अशा अनेक प्रकारचे सायबरचे गुन्हे वाढू लागले आहेत. गुन्ह्यांचा तपास करणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील सायबर गुन्हे शाखेकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार जानेवारी ते डिसेंबरमध्ये २०२५ या कालावधीत ८ गुन्हे दाखल झाले होते. या गुन्ह्यात दोन कोटी २७ लाख ८३ हजार ४०३ रुपयांची फसवणूक झाली होती. सायबर पोलीस ठाणे मार्फत आपल्या शैलीने शोध घेत ४० लाख ८५ हजार रुपयांची रक्कम परत करण्यात यश आले आहे. २०२५ मध्ये एकूण २०१४ हरविलेल्या मोबाईलपैकी एक हजार ९० मोबाईलचा शोध घेण्यास सायबर पोलीस ठाणे विभागाला यश आले. ते मोबाईल जप्त करून संबंधित व्यक्तींना परत करण्यात आले आहे. रायगड पोलिसांची ही कामगिरी महाराष्ट्रामध्ये प्रथम क्रमांकाची ठरली आहे. सीईआयआर पोर्टलचा प्रभावीपणे वापर करून हरविलेले मोबाईल परत मिळविले आहेत. मागील तीन ते चार वर्षापासून हरविलेले मोबाईल या आधुनिक पध्दतीने मिळविण्यास पोलिसांना यश आले आहे. सायबर गुन्हेगारीला रोखण्यासाठी पोलीस दल शर्तीचे प्रयत्न करीत असले, तरीही सायबर गुन्ह्यांची उकल आणि कायदेशीर कारवाई पूर्ण होण्याची ही संथ गती जिल्ह्यातील सायबर प्रगतीला अडथळा ठरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातही सायबर गुन्हे शाखेचे कार्यालय उभारण्यात आले. या ठिकाणी इंटरनेटची माहिती असलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. परंतु सतत इंटरनेटची समस्या उद्भवत असल्याने या गुन्ह्याची उकल करताना पोलीसांना अडचणी येत आहेत. मात्र नागरिकांनी ऑनलाईन आर्थिक व्यवहार करताना फसवणूक होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. हे व्यवहार करताना जरा जपून करा असे कायमच पोलिसांकडून सांगितले जाते. परंतु त्याची अंमलबजावणी कितपत होते. हा प्रश्न कायमच आहे.

लोकसंसद

## अर्थसंकल्प आणि ज्येष्ठ नागरिकांचा अपेक्षाभंग

आर्थिक विकासाला गती देणे, लोकांच्या आकांक्षा पूर्ण करणे आणि 'सर्वांची साथ, सर्वांचा विकास' दृष्टिकोन राबविणे या तीन कर्तव्यांवर लक्ष केंद्रित करणारा २०२६-२७ या वर्षासाठीचा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नुकताच संसदेत सादर केला. सर्व सामान्यांच्या बाबतीत हा अर्थसंकल्प काही प्रमाणात दिलासा देणारा असला तरी, या अर्थसंकल्पापूर्वी प्रवाशांची जी एक प्रमुख मागणी होती, ती म्हणजे देशातील ज्येष्ठ नागरिकांसाठी रेल्वे भाड्यामध्ये दिली जाणारी आणि २०२० मध्ये कोविड-१९ महामारीच्या काळात एक तात्पुरता, काटकसरीचा उपाय म्हणून बंद करण्यात आलेली सवलत पुन्हा सुरू करणे. मात्र ती मागणी पूर्ण करण्यात आलेली नाही. ही सवलत बंद करण्यापूर्वी ६० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या पुरुष प्रवाशांना तिकिटांवर ४० टक्के सवलत मिळत होती तर ५८ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या महिलांना ५० टक्के सवलतीचा लाभ मिळत होता. या योजनेत मेल आणि एक्सप्रेस गाड्या तसेच राजधानी, शताब्दी आणि दुरंतो यांसारख्या प्रीमियम सेवा असलेल्या अनेक गाड्यांचा समावेश होता. मात्र आता पाच वर्षानंतर रेल्वे सेवा पूर्ण क्षमतेने सुरू झाल्या असतानाही ही सवलत अद्याप पुन्हा सुरू करण्यात आलेली नाही. त्यामुळे देशातील अंदाजे १४.९ कोटी ज्येष्ठ नागरिकांचा (त्यात रेल्वेने प्रत्यक्ष प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या जेमतेम १ कोटी इतकी आहे) अपेक्षाभंग झाला आहे.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक

१८५७ साली झालेला उठाव हा भारतीय इतिहासातील इंग्रजांविरोधात झालेला पहिला उठाव आहे असे मानले जाते मात्र त्या अगोदरही इंग्रजांना भारतातून हाकलून देण्यासाठी अनेक छोटेमोठे उठाव झाले मात्र त्यातील काही उठावांची नोंद इतिहासात घेण्यात आली तर काही काही उठावांची नोंदच झाली नाही. अशाच एका उठावाचे जनक ज्यांनी इंग्रजांना सलग १४ वर्ष पळता भुई केली त्या आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांची आज पुण्यतिथी मात्र आज त्यांची पुण्यतिथी आहे हे किती लोकांना माहीत आहे हा संशोधनाचा विषय आहे. कित्येकांना हे नाही माहितही कारण ते ज्या समाजात जन्मले तो रामोशी बेडर समाज आजही उपेक्षितच आहे त्यामुळे इतका मोठा क्रांतिकारक भारताच्या इतिहासात होऊन गेला हे आजही अनेकांना माहीत नाही. आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिवडी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचे नाव दादोजी खोमणे होते. त्यांचे कुटुंबीय पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत असे म्हणून त्यांना नाईक ही पदवी मिळाली पुढे ते नाईक याच नावानेच ओळखले जाऊ लागले. लहानपणापासून काटक, चंचल आणि शूर असणारे निधड्या छातीचे उमाजी नाईक यांना गुलामगिरीची चीड होते. १८३० साली इंग्रजांनी पुण्यात दुसऱ्या बाजीरावास स्थानापन्न केले तेंव्हा त्याने पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी रामोशी बेडर समाजाकडून काढून घेतली आणि स्वतःच्या मर्जीतील लोकांना ती जबाबदारी दिली त्यामुळे साहजिकच राम ोशी समाज खवळला त्यांच्यावर उपासम ारीची वेळ आली. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली जबाबदारी अशी अचानक काढून घेतल्याने उमाजी नाईक कमालीचे संतप्त झाले शिवरायांपासूनच स्फूर्ती घेऊन त्यांनी आपल्या काही साथीदारांसह इंग्रजांना भारतातून हाकलून देण्याची शपथ घेतली. उमाजी नाईक समाजातील गोरगरिबांना आर्थिक मदत करत त्यासाठी ते इंग्रज, सावकार आणि मोठ्या वतनदारांना लुटत. जर कोणी माता भगिनींवर अन्याय करत असत तर ते भावाप्रमाणे धावून जात असत. या दरम्यान त्यांना एकदा अटक झाली त्यांना एका वर्षाची शिक्षा झाली. या एका वर्षात ते तुरुंगातच लिहायला शिकले. एका वर्षाची शिक्षा भोगून आल्यावर त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानून त्यांनी इंग्रजांविरुद्ध लपून छपून लढाया केल्या. उमाजी नाईक यांच्या या गनिमीकाव्याने इंग्रज मेटाकुटीला आले. इंग्रज अधिकारी उमजींना पकडण्यासाठी जंग जंग पछाडत होते मात्र उमाजी त्यांच्या हातावर तुरी देत होते. एकदा इंग्रज आणि उमाजींचे सैन्य समोरासमोर आले तेंव्हा उमाजींच्या सैन्याने इंग्रजांच्या सैन्याचा पराभव केला. या लढाईत उमाजींनी पाच इंग्रजांची मुंडकी उडवली त्यामुळे इंग्रज अधिकच भयभीत झाले. त्यांच्या मनात उमाजींची भीती बसली. १८२४ ला उमाजींनी भाबुर्डी येथील इंग्रजांचा खजिना लुटून देवळाच्या देखभालीसाठी लोकांना वाटला. २१ डिसेंबर १८३० ला उमाजींनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्याला मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवून पळवून लावले. त्यांच्या या बंडाला जनतेतूनही मोठा प्रतिसाद मिळत होता. उमाजी नाईक यांनी इंग्रजांविरुद्ध एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता त्यात त्यांनी नमूद केले होते की लोकांनी इंग्रजांच्या नोकऱ्या सोडाव्यात. इंग्रजांविरुद्ध सर्वांनी एकत्र यावे. इंग्रज सरकार विरोधात अराजकता माजवावी. इंग्रजांचा खजिना लुटून तो गोरगरिबांना वाटावा. इंग्रजांशी असहकार पुकारवा. त्यांना शेतसारा, पट्टी देऊ नये. त्यांच्या या जाहिरनाम्याचे पालन सर्वसामान्य जनता करू लागल्याने इंग्रज आणखी बिथरले. त्यांनी उमाजींना पकडण्यासाठी आता फोडा आणि झोडा नीती अवलंबली. आद्यक्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, पुणे**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**३ फेब्रुवारी**

१)श्री.श्रीकृष्ण नारायण धर्माधिकारी श्रीबाग-२ अलिबाग ०३-०२-१९४८
२)श्री.मोहन पंढरीनाथ कोर्लेकर विद्यानगर, चेंढरे, अलिबाग ०३-०२-१९४६
३)श्री.हरिश्चंद्र बाबाजी पाटील कुरूळ, अलिबाग, ०३-०२-१९४९
४)डॉ.प्रतिभा सुभाष म्हात्रे मु.थळ, अलिबाग ०३-०२-१९६२

# हवेच्या गुणवत्तेत घसरण

## • वसई-विरारला वायू प्रदूषणाचा विळखा; नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**। पालघर । प्रतिनिधी ।**

वसई-विरार शहरात वायू प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली आहे. प्रदूषणामुळे श्वास घेणेही कठीण झाले आहे. शहराचा वायू गूणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) १५० च्या पुढे गेला आहे. मात्र वसई-विरार महापालिका प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांच्या आरोग्याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.



मुंबईतील प्रदूषणाच्या मुद्द्यावर उच्च न्यायालयाने अलीकडेच कडक भूमिका घेत पालिका प्रशासनाला धारेवर धरले होते. त्याच पार्श्वभूमीवर वसई-विरार महापालिकेच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरात सुरू असलेली बांधकामे, वाहनांमधून निघणारा धूर आणि तसेच ठिकठिकाणी पेटवल्या जाणाऱ्या शेकोट्या यामुळे वातावरणातील प्रदूषकांचे प्रमाण वाढले आहे. नागरिकांना मोकळा श्वास घेणे कठीण होऊन बसले आहे. मात्र या सर्वांवर नियंत्रण ठेवण्यात महापालिका अपयशी ठरत असल्याचा आरोप होत आहे.

वाढत्या प्रदूषणामुळे दमा, खोकला, श्वसनाचे आजार वाढत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर एक समाजसेवकाने महापालिकेच्या हलगर्जीपणामुळे उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याची तयारी सुरू केल्याची माहिती आहे. त्यामुळे येत्या काळात वसई-विरार महापालिकेला न्यायालयीन प्रश्नांना सामोरे जावे लागण्याची शक्यता असून, प्रदूषणाच्या मुद्द्यावर प्रशासनाला अखेर जाग येणार का?, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

### महापालिका यंत्रणेवर प्रश्नचिन्ह

**प्रदूषण नियंत्रणासाठी महापालिकेने राष्ट्रीय हवा शुद्धीकरण उपक्रमांतर्गत कोट्यवधी रुपये खर्चून फॉग कॅनन वाहने खरेदी केली आहेत. सुमारे तीन कोटी रुपयांची ही यंत्रणा हवेत उडणारे धूलिकण कमी करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. मात्र प्रत्यक्षात ही वाहने शहरभर फिरताना क्वचितच दिसतात. अनेकदा ही यंत्रणा महापालिका मुख्यालयाच्या आवारातच उभी असल्याचे चित्र आहे. त्यामुळे वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण कसे आणणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.**

### उपाययोजना करण्याची मागणी

**हवेची गुणवत्ता घसरत असल्यामुळे लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना खोकला, सर्दी, श्वसनाचा त्रास, डोळ्यांना जळजळ, घसा खवखवणे अशा विविध तक्रारी जाणवू लागल्या आहेत. त्यामुळे शहरातील वाढते प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.**

## निवडक



### फडके नाट्यगृहात सांस्कृतिक कार्यक्रम

**पनवेल :** पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव फडके नाट्यगृहात महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या वतीने भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ठाणे आदिवासी विभागाचे अप्पर आयुक्त अंतर्गत एकात्मिक आदिवासी प्रकल्प, पेण यांच्या विद्यमाने आदिवासी शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींची संयुक्त कार्यशाळा व सांस्कृतिक कार्यक्रम २०२६ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन आय.पी.एस. कृष्ण प्रकाश यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमास आदिवासी विकास विभागाचे अधिकारी, कर्मचारी, मान्यवर तसेच वसतिगृहातील मुले-मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारा हा कार्यक्रम उपस्थितांनी कौतुकाने अनुभवला.

### सामाजिक उपक्रमांतून स्मृतिदिन साजरा



**उरण :** उरण नागाव येथील श्रीराज काका पाटील यांचा १८ वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. श्रीराज पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून दरवर्षी स्मृतिदिनानिमित्त सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये वृद्धाश्रमांना मदत विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप व गरजूंना मदत केली जाते. याही वर्षी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून अनाथ आश्रम पनवेल येथे बालग्राम अनाथ आश्रम पनवेल येथे जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. श्रीराज पाटील चॅरीटी ट्रस्टचे अध्यक्ष श्रीयान सागर काका पाटील यांच्या हस्ते बाल ग्राम अनाथाश्रम पनवेल येथे संस्थेच्या अध्यक्षाकडे खाऊ व कडधान्ये सुपूर्द करण्यात आले. यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते काका पाटील पंचायत समितीच्या माजी सदस्य माया पाटील व कुटुंबीय हजर होते.

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**रविंद देवचंद पवार, ५ वे पुण्यस्मरण**

## चिमुकलीच्या अपहरणाचा प्रयत्न फसला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

परळच्या गजबजलेल्या परिसरात शनिवारी एक धक्कादायक प्रकार घडला. एका तीन वर्षांच्या चिमुकलीच्या अपहरणाचा प्रयत्न झाला.मात्र शिवसैनिक आणि मनसैनिकांच्या सतर्पतेमुळे हा प्रयत्न उधळला गेला. आरोपीला पकडून जमावाने चोप दिला आणि त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले.

परळमधील डॉ. बाटलीवाला रोडवरील हरी बिल्डिंग येथून या तीन वर्षीय मुलीच्या अपहरणाचा प्रयत्न झाला. ही व्यक्ती अनोळखी असल्याने व हालचाली संशयास्पद दिसल्याने त्याला स्थानिक कार्यकर्ते व नागरिकांनी हटकले. त्यानंतर मोठी गर्दी जमा झाली. जमावाने पकडून चोप देताच त्याने गुन्हा कबूल केला.

त्यानंतर याबाबत पोलिसांना माहिती देण्यात आली असता पोलिसांनी या आरोपीला ताब्यात घेतले. दरम्यान, भोईवाडा पोलीस ठाण्यात मुलीच्या आईने तक्रार दाखल केली असून त्याआधारे पोलिसांकडून अधिक तपास केला जात आहे. आरोपी दारूच्या नशेत होता, असे सांगण्यात येत आहे.

## हेल्मेट वाटपाच्या माध्यमातून जनजागृती

**। उरण । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाच्या उपक्रमांतर्गत नाव्हाशेवा वाहतूक शाखा आणि आयसीआयसीआय लोम्बार्ड व सेवा सहयोग फाऊंडेशन यांच्या संयुक्त तत्वावधानात वाहतुकीचे प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात १०० हेल्मेटचे वाटप करून वाहतुकीच्या नियमांबाबत माहिती देण्यात आली. तसेच, हेल्मेट वाटपाच्या माध्यमातून नागरिकांना जागरूक करण्यात आले.



कार्यक्रमाचे मार्गदर्शक व. पो. नि. वैशाली गलांडे, आयसीआयसीआय लोम्बार्ड व सेवा सहयोग फाऊंडेशन यांच्या वतीने विनय बर्वे, रेश्मा पट्टम, प्रशांत उपहार यांनी नागरिकांना वाहतुकीच्या नियमांबाबत सविस्तर माहिती दिली आणि हेल्मेट वापराचे महत्त्व समजावून सांगितले. या कार्यक्रमात सुमारे १०० ते १२९ नागरिकांनी भाग घेतला होता.

आयसीआयसीआय लोम्बार्ड व सेवा सहयोग फाऊंडेशन यांच्या सहकार्याने राईड टू सेफ्टी हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमाचा एक भाग म्हणून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या आयोजनामुळे नागरिकांना वाहतुकीच्या नियमांबाबत माहिती मिळाली आणि त्यांना सुरक्षित वाहतुकीच्या पद्धती शिकवण्यात आल्या. या कार्यक्रमाचा परिणाम म्हणून नागरिक भविष्यात सुरक्षित वाहतुकीच्या नियमांचे पालन करतील, अशी आशा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## हर्णे बंदरातील मासेमारी मंदावली

**रत्नागिरी :** गेल्या आठवड्यापासून सुरू असलेल्या वाऱ्यांचा परिणाम मासेमारीवर झालेला दिसत आहे. त्यामुळे हर्णे बंदरात मासळीची आवक घटली आहे. चार बॅरल डिझेल संपवून दोन बॅरलचे ही पैसे सुटत नाही. परिणामी येथील मासेमारी तोट्यात चाललेली असल्याने मच्छिमार चिंतेत पडला आहे. मागील महिन्यात कोळंबी आणि पापलेटने साथ दिल्यामुळे तेजीत असलेली हर्णे बंदरातील मासेमारी सध्या मात्र मंदावली आहे. गेले १५ दिवस येथील मासळीची आवक दिवसेंदिवस घटत चालली आहे.

## श्रीवर्धन-विठ्ठलवाडी बससेवा सुरू

**। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।**

कल्याण आणि विठ्ठलवाडी परिसरात कामानिमित्त असणाऱ्या श्रीवर्धन तालुक्यातील ग्रामस्थांच्या दीर्घकालीन मागणीनंतर श्रीवर्धन-शेखाडीमार्गे विठ्ठलवाडी ही नवीन बससेवा सुरू करण्यात आली. यापूर्वी कल्याण डेपोची विठ्ठलवाडी-दिवेआगर बससेवा सुरू होती. मात्र या गाडीचे वेळापत्रक वारंवार कोलमडत असल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता.

वेळेवर गाडी न मिळाल्याने कामगार, नोकरदार आणि या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवासी वर्गाची अडचण होत होती. ही बाब लक्षात घेऊन येथील पत्रकारांनी या बस सेवेसाठी श्रीवर्धन आगाराकडे सातत्याने पाठपुरावा केला. प्रवाशांची प्रत्यक्ष गरज,वाढती मागणी लक्षात घेऊन श्रीवर्धन डेपोकडून स्वतंत्रपणे श्रीवर्धन-शेखाडी, बोर्ली पंचतन,

### पत्रकारांच्या पाठपुराव्याला यश

साईमार्गे विठ्ठलवाडी ही नवीन बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दि.१ फेब्रुवारी रोजी बोर्ली पंचतन बसस्थानकात विजय कांबळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून गाडीचा शुभारंभ करण्यात आला. चालक व वाहक यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा देत गाडी अधिकृतपणे रवाना करण्यात आली. यावेळी बोर्ली




पंचतन स्थानक प्रमुख रवींद्र वेळासकर, माजी स्थानक प्रमुख प्रसाद मोरे, पत्रकार विजय कांबळे, मकरंद जाधव, मुजफ्फर अलवारे, अमोल चांदोरकर सामाजिक कार्यकर्ते लीलाधर खोत त्याचबरोबर भाई शिलधनकर, मच्छिंद्र तोंडलेकर, प्रदीप शिंदे, ऋणाल सातनाक, शैलेश भाटकर आसिफ आकलेकर, मकबूल दर्जी बसस्थानक कर्मचारी बाबू पाटील व प्रवासी उपस्थित होते. नवीन बससेवा सुरू करून प्रवाशांची गैरसोय दूर केल्याबद्दल उपस्थितांनी श्रीवर्धन आगार प्रमुख मेहबूब मणेर यांचे आभार व्यक्त केले.



### रोहिदास जयंती उत्साहात साजरी

**तळा :** तळा शहरात संत रोहिदास महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील रोहिदास नगर येथे संत रोहिदास महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. रात्री रोहिदास समाज सभागृहात जेष्ठ नागरिकांच्या सत्काराचा कार्यक्रम पार पडला. यावेळी रोहिदास महाराजांच्या जीवनकार्याची महती सांगण्यात आली. तसेच, गावातील मुलामुलींच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गावातील मुलामुलींनी पारंपरिक गीतांवर आपल्या कलेचे सादरीकरण केले. बक्षीस वितरणानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. याप्रसंगी संत रोहिदास नगर ग्रामस्थ व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### शारविल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन

**कर्जत :** हुमेरा फाउंडेशन ट्रस्ट संचलित शारविल स्कूल ऑफ एक्सलन्स, नेरळ यांचा वार्षिक स्नेहसंमेलन तस्वीर हा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला. नेरळ येथील हाजी मुजाहिद खोत सेलिब्रेशन हॉल येथे आयोजित या कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी तसेच शिक्षणप्रेमी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, गायन व विविध समूह सादरीकरणांद्वारे आपली कला सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. यामध्ये विशेष आकर्षण ठरले ते एका नटाने सादर केलेले गोविंदाचे नृत्य. दहीहंडी, कृष्णलीला आणि पारंपरिक ताल-लयीत साकारलेल्या या नृत्याने संपूर्ण सभागृह दुमदुमून गेले. टाळ्यांच्या गजरात प्रेक्षकांनी उभे राहून या सादरीकरणाला भरभरून दाद दिली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई आयकर/जीएसटी विभागाचे अतिरिक्त आयुक्त तारीक मबूद तसेच डॉ. अम्ब्रिश दुबे उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे मनापासून कौतुक करत, अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो व व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले.

### भरदिवसा लाखोंचे दागिने लंपास

**रत्नागिरी :** रत्नागिरी शहरालगतच्या शिळ-वाडकरवाडी परिसरात भरदिवसा घरफोडी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. घरात कोणीही नसताना अज्ञात चोरट्याने कपाटातील तब्बल ५ लाख १० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले. याप्रकरणी रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी निलेश नारायण भातडे (५२) यांचे कुटुंब दि.३१ जानेवारी रोजी दिवसभर घराबाहेर होते. या संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घराच्या मागील लाकडी दरवाजा जोरात ढकलून त्याची कडी उचकटून आत प्रवेश केला आणि कपाटातील मौल्यवान दागिने चोरून नेले. निलेश भातडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून रत्नागिरी शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## पान १ वरून

### खोटी बिले काढणाऱ्यांना घरी बसवा

अलिबाग-रोहा रस्ता मंजूर करून आणला. या रस्त्याला २६० कोटींचा निधी आणला. मात्र, या रस्त्याचे उद्घाटन आणि नारळ फोडण्याचे श्रेय विरोधकांनी घेतले. विकासाच्या नावाखाली २० टक्क्यांचे राजकारण सध्या सुरू आहे. रामराजच्या विकासासाठी शेतकरी कामगार पक्षाने नेहमीच यशस्वी प्रयत्न केले आहेत. त्यामुळेच या परिसरातील जनता शेतकरी कामगार पक्षाच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. ज्या ठेकेदारांनी बोगस विकासकामे केली आहेत, त्या नेतृत्वधारी ठेकेदारांना त्यांची जागा दाखविण्यासाठी कार्यकर्त्यांनो सज्ज राहा. शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी विकासात्मक दृष्टीकोन ठेवून रामराज परिसरात आपले पक्षीय बळ वाढविण्यासाठी प्रयत्न केले. याचाच प्रत्यय निवडणुकीच्या निकालामध्ये नेहमीच वरचढ असलेला पहावयास मिळाला आहे. हीच पक्षाबरोबर असणारी एकनिष्ठता कायम ठेवून खटाऱ्यासोबत राहा. येणारे चार दिवस आपल्या परीक्षेचे आहेत. आपल्या सहकार्याने आपला उमेदवार रायगड जिल्हा परिषदेवर शेकाप-महाविकास आघाडीचा झेंडा फडकविण्यासाठी पाठवा. ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी आहे. त्यामुळे विकासात्मक दृष्टिकोन असणाऱ्या नेतृत्वाच्या मागे खंबीरपणे उभे राहा, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले.

तसचे, सांबरकुंड मध्यम प्रकल्प उभारणी साठीचा प्रश्न शेतकरी कामगार पक्षाने नेहमीच शासन दरबारी मांडला आहे. सांबरकुंड धरणांमध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांबरोबर शेकाप आणि महाविकास आघाडी कायम राहणार आहे. खैरवाडी, जांभुळवाडी, सांबर डोहवाडी, महान आणि महानवाडी या गावातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा देणार आहोत. पुनर्वसन होणाऱ्या गावांबरोबर धरणाच्या भिंती लगत असणाऱ्या महान आणि महानवाडी या गावचे पुनर्वसन आणि जमिनीचा योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी सरकार दरबारी न्याय मागणार आहोत, असे शेकाप देखील शेकाप सरचिटणीस जयंत पाटील म्हणाले.

### भाजपकडून हिंदू संस्कृतीला तडा

सोनाली मोरे, चौल जिल्हा परिषद मतदारसंघाचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे, चौल-वरंडे पंचायत समितीच्या उमेदवार अनया अमित फुंडे, रेवदंडा-नागाव पंचायत समितीचे उमेदवार राकेश वसंत म्हात्रे यांच्यासह शेकाप-महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आघाडीच्या उमेदवारांना मिळणारा वाढता प्रतिसाद पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकू लागल्याचा दावा त्यांनी केला.

अजित पवार यांच्याबाबत बोलताना जयंत पाटील म्हणाले, गेल्या ४० वर्षांत आम्ही विविध सहकारी संस्था, विधिमंडळ, राज्य मध्यवर्ती बँक, मार्केटिंग फेडरेशन अशा अनेक पातळ्यांवर एकत्र काम केले. ते शब्दाला पक्के होते. टीका केली तरी सभा संपल्यावर 'तुमचे समाधान झाले का?' अशी आपुलकीने विचारपूस करायचे. अशा व्यक्तीच्या घरात दुःख असताना घाईघाईने शपथविधी करणे, ही कोणती संस्कृती आहे? हिंदू धर्मातील शोकसंस्कृतीचा उल्लेख करत त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, घरात मृत्यू झाल्यानंतर बारा-तेरा दिवस शोक पाळण्याची परंपरा आहे. विधवा स्त्री घराबाहेर पडत नाही. मग अशा वेळी सत्ता मिळवण्यासाठी घाई का? अजित पवार युतीतून बाहेर पडणार होते, मागील पंधरा दिवसांपूर्वीपासून त्यांची भाषणे भाजविरोधातील होती, त्यामुळेच ही घाई झाली, असा आरोपही त्यांनी केला.

राज्यातील सत्ताधाऱ्यांवर टीका करताना ते म्हणाले, नीतीमत्ता सोडून सरकार चालवले जात आहे. शपथविधी महिना-पंधरा दिवसांनी झाला असता तरी चालले असते. परंतु, सत्तेसाठी कोणतीही दया-माया ठेवलेली नाही. म्हणून अशा सरकारला बाहेर काढणे गरजेचे आहे. जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित केला. ज्या रस्त्याची किंमत हजार रुपये आहे, त्याचे दहा हजारांचे बिल केले जाते. हा भ्रष्टाचार उखडून टाकायचा आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. शेकाप, शिवसेना आणि काँग्रेस एकत्र आल्यावर जिल्हा परिषदेत सत्ता आपलीच राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सुरेंद्र म्हात्रे यांच्याबद्दल बोलताना ते म्हणाले, ते शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आहेत. त्यांच्या डोक्यावर माझा आशीर्वाद आहे. त्यांचा विजय निश्चित आहे. आग्राव हा शेकापचा बालेकिल्ला असल्याचे सांगत यावेळी विक्रमी मताधिक्य मिळवण्याचे आवाहन त्यांनी केले. पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले की, शेकापची चौथी पिढी आम्ही निवडणुकीत उतरवत आहोत. वकील, डॉक्टर, इंजिनिअर अशा उच्चशिक्षित तरुणांना उमेदवारी दिली आहे. आज राजकारण पैशावर चालते. फॉर्म मागे घ्यायला कोट्यवधी रुपये दिले जातात. अशा खालच्या पातळीवर राजकारण गेले आहे. परंतु, उच्चशिक्षित उमेदवार ही खऱ्या अर्थाने शेकापची ताकद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अलिबाग तालुक्यातील अष्टागर परिसरातील १६ कोळीवाड्यांच्या विकासाचे नियोजन आपण केले असल्याचे सांगत त्यांनी आग्राव जेटीच्या कामाची आठवण करून दिली. चौलमध्ये शेकाप आणि शिवसेनाच आहे. शेकापची मते बदलत नाहीत, असा दावा त्यांनी केला. एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना त्यांनी आमदारांना ५०-५० कोटी रुपये दिल्याचा आरोप केला. एवढे पैसे आले कुठून? तुम्हीच त्यांना कमवायला संधी दिली आहे. ज्याला विधिमंडळाचे कामकाज कळत नाही, असा आमदार तुम्ही पाठवून दिला आहे. अशा आमदाराला तुम्ही दोन वेळा निवडून दिले आहे. आता हे पाप तुम्हीच परत फिटवायचे आहे, तुम्ही आम्हाला साथ द्या, असे आवाहन शेकापसह महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना केले. आग्रावचे जे गरीब कार्यकर्ते, गरीब कोळीबांधव आहेत, ते शंभर टक्के महाविकास आघाडीबरोबर राहतील, आमचे तीन पिढ्यांचे संबंध आहेत, ते मी जसे अबाधित ठेवलेत, तसे माझ्या कार्यकर्त्यांनीही ठेवल्याचे जयंत पाटील यांनी सांगितले. मी प्रतिज्ञा केली आहे, की ज्यावेळी ७९ साली मी निवडून आलो होतो, त्यावेळी आपल्या १८ पैकी १८ जागा निवडून आल्या होत्या, आता २१ पैकी २१ जागा आपल्याला खेचून आणायच्या आहेत. याठिकाणी तुम्ही शिवसेना किंवा सुरेंद्र म्हात्रे यांना नाही, तर जयंत पाटील यांना मत देत आहात, असे समजून मतदान करा, असे आवाहन शेवटी त्यांनी शेकाप-महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना केले.

### आमदारांची फूस, ठेकेदाराची लूट

कथित भ्रष्टाचार उघड झाला आहे. मिठागर गावात उघड झालेल्या कथित भ्रष्टाचार प्रकरणामुळे शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी थेट राजकीय अडचणीत सापडले आहेत. गावात रस्ते, पाणीपुरवठा, सभागृह अशी विकासकामे प्रत्यक्षात दिसत नसताना आ. महेंद्र दळवी यांच्या नावाचे शिलालेख मात्र ठळकपणे झळकत आहेत. त्यामुळे आमदारांच्या सांगण्यानुसारच ठेकेदार मलमपट्टी लावत असल्याचा आरोप मुरुडकरांकडून केला जात आहे. 'काम अपूर्ण आणि शिलालेख पूर्ण' हे चित्र केवळ प्रशासकीय अपयश नसून, राजकीय नैतिकतेवरचा थेट घाव असल्याची भावना ग्रामस्थांतून व्यक्त होत आहे.

**ठेकेदार, अधिकारी निशाण्यावर?**

अर्जामध्ये चार वेगवेगळ्या ठेकेदारांची नावे स्पष्टपणे नमूद करून त्यांच्यावर शासनाची दिशाभूल, खोटी बिले, निकृष्ट काम व न केलेल्या कामाचे पूर्ण बिल काढल्याचे आरोप करण्यात आला आहे. तसेच, स्थानिक ग्रामपंचायतचे ग्रामसेवक, सरपंच, गटविकास अधिकारी, पंचायत समितीचे अभियंते यांच्यावरही बिले मंजूर करण्यासाठी योग्य सहकार्य करून शासनाची फसवणूक केल्याचा थेट उल्लेख आहे. अर्जदाराने जिल्हाधिकाऱ्यांकडे या सर्व ठेकेदारांची नावे काळ्या यादीत (ब्लॅक लिस्ट) टाकण्याची, न केलेल्या कामांच्या मंजूर बिलांची संपूर्ण रक्कम व्याजासकट परत वसूल करण्याची आणि संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे नोंदवण्याची मागणी केली आहे. महेश ठाकूर यांनी ही माहिती माहितीच्या अधिकारातून मिळविल्याचे अर्जात नमूद केले आहे. त्याबरोबरच स्मशान रस्ता परिसर, स्मारक फलक, जीपीएस लोकेशन असलेले फोटो सादर करून प्रत्यक्ष जागेवर काम अपूर्ण, निकृष्ट किंवा अस्तित्वातच नसल्याचा दावा बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

### बंद शाळा पुन्हा उघडणार

५९ गटातील आणि पंचायत समितीच्या ११८ गणांतील मतदार संघात निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. ठिकठिकाणी प्रचार वेगात सुरु आहेत. येत्या ७ फेब्रुवारीला सकाळी साडेसात ते साडेपाच यावेळेत मतदान असणार आहे. २ हजार ३२३ मतदान केंद्रात मतदान होणार आहे. त्यामध्ये बंद पडलेल्या ३०४ शाळांचा देखील समावेश आहे. मतदान केंद्र सुसज्ज असणे आवश्यक आहे. त्यामुळे बंद पडलेल्या शाळांची दुरुस्ती करण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभाग कामाला लागले आहे. बंद पडलेल्या शाळांमधील परिसर स्वच्छ करण्याबरोबरच उभारण्यात येणाऱ्या मतदान केंद्रावर अधिकारी व कर्मचाऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी योग्य अशी तयारी सुरू केली आहे. या शाळांमध्ये पाणी, वीज, स्वच्छतागृह अशा सुविधा उपलब्ध करण्यासाठी काम सुरु करण्यात आले आहे. बंद पडलेल्या या शाळा मतदानामुळे पुन्हा उघडल्या जाणार आहेत. परिसरात किलबिलाट असणार आहे. मात्र, तो किलबिलाट विद्यार्थ्यांचा नसून मतदानासाठी येणाऱ्या मतदारांचा असणार आहे. अनेकांच्या हातात मतदान कार्ड असणार आहे. मतदान प्रक्रीया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी मतदारांवर लक्ष ठेवण्यासाठी पोलिस असणार आहे. रांगेत उभे राहून मतदान करण्यासाठी केंद्रात येण्याची व्यवस्था असणार आहे.

### रेल्वेतून पडल्याने तरुणाचा मृत्यू

असल्याचे बोलले जात आहे. या तरुणाच्या मृत्यूची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी करण्यात आली आहे. याप्रकरणी पुढील तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

### ट्रेलरखाली चिरडून चालकाचा मृत्यू

पुढे सरकला. त्यावेळी बृजभान यादव हा ट्रेलरच्या पुढे असल्याने तो ट्रेलर त्याच्या अंगावरून गेला. त्यात तो गंभीर जखमी झाला. मात्र, त्याला उपचारासाठी जवळच्या हॉस्पिटलमध्ये नेले असता त्याआधीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# मद्यधुंद पर्यटक ठरताहेत डोकेदुखी

## श्रीवर्धनमध्ये वाहनांचे अपघात चिंताजनक; वाहनाची तपासणी करण्याची मागणी

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यात गेल्या काही वर्षात देशाभरातील पर्यटकांचे आकार्षण केंद्र ठरत आहे. येथील शांत समुद्र किनारा सफेद वाळू सभोवताळचे निसर्गरम्य वातावरण मन मोहून टाकत आहे. परंतु, श्रीवर्धन तालुक्यात गेल्या दोन वर्षांत पर्यटकांच्या वाहनांचे किरकोळ अपघात ते भिषण अपघात ही मालिका बंद होण्याचे नाव घेत नाही. ती अद्यापही सुरू आहे. सतत होणाऱ्या अपघातांत एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती अपघात ग्रस्त वाहनांवरील मद्यधुंद



अवस्थेतील चालक.

हरिहरेश्वर येथील होम स्टे मालकाशी खोली भाड्या वरुन झालेल्या वादातून पर्यटक चालकाने मालकाच्या बहिणीला चारचाकी वाहनाखाली चिरडल्याची घटना, श्रीवर्धन येथे अल्पवयीन थार चालकाने दुचाकीस्वाराला चिरडल्याची घटना तसेच दिवेआगर येथे चारचाकीने दुचाकीला उडवत चालकाला फरफटत नेल्याने दुचाकीस्वाराचा चिरडून झालेला मृत्यू, या तिन्ही घटनांतून चालक हा मद्यधुंद अवस्थेत होता हे निष्पन्न झाले आहे.

हरिहरेश्वर येथील दुर्घटनेनंतर पर्यटकांच्या वाहन तपासणी करीता काही दिवस महत्त्वाचा ठिकाणी पोलीस ठाण्या कडून चेकपोस्ट उभारण्यात आले होते. परंतु, श्रीवर्धन तालुक्यात एक धक्कादायक माहिती समोर येत आहे, ती म्हणजे काही पर्यटन व्यवसायीक आलेल्या पर्यटकांना मद्यपानाची व्यवस्था करीत असल्याची. श्रीवर्धन तालुक्यातील स्थानिक पर्यटन व्यवसायीक हे प्रशासनाने दिलेल्या नियमावलीनुसार आपला व्यवसाय करीत आहेत. मुंबई व पुणे शहरातील धनदांडग्यांनी तालुक्यात रिसॉर्ट, रेस्टॉरंट थाटून व्यवसाय हा केअर टेकर सोपवला आहे. सदरचे केअर टेकर हे आलेल्या पर्यटकांना मद्यपान पुरवठा करीत असल्याचे बोलले जात आहे.

### व्यवसाय केअर टेकरच्या हाती

श्रीवर्धनमधील एका पर्यटन व्यवसायीकाने आपले नाव उघड न करण्याच्या अटीवर सांगितले की, तालुक्या बाहेरून आलेले धनाढ्य इथे रिसॉर्ट व्यवसाय थाटून केअर टेकरकडे सोपवतात. हेच केअर टेकर सर्रास पर्यटकांना मद्य पुरवतात. श्रीवर्धनमधील थार अपघात प्रकरणातील अल्पवयीन तरूण हे आलेल्या रेस्टॉरंटवर दोन दिवस मद्यपान करून गोंधळ घालत होते. स्थानिकांनी ही घटना केअर टेकरच्या कानावर घातली होती. परंतु, त्यांनी दुर्लक्ष केले.

# दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा मार्गदर्शन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आगरी समाज संस्थेतर्फे चिखली हायस्कूल, कुर्डूस हायस्कूल व कुसुंबळे हायस्कूल येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात आगरी समाज संस्थेचे शैक्षणिक उपक्रम प्रमुख मिलिंद धोदरे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेतील ताणतणाव कसा कमी करावा, परीक्षेपूर्वी अभ्यासाची योग्य आखणी कशी करावी, आत्मविश्वास वाढवण्याचे मार्ग तसेच उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी ध्यान कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले.




मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन व आत्मविश्वास निर्माण झाल्याचे स्पष्टपणे जाणवत होते. उपक्रमाच्या माध्यमातून आगरी समाज संस्थेने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आपली सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली. याप्रसंगी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी उपयुक्त असे परीक्षा किट वितरित करण्यात आले.

कार्यक्रमास रोटरी क्लब अलिबागचे अध्यक्ष अंकुश पाटील, आगरी समाज संस्थेचे सचिव प्रभाकर ठाकूर, श्रेयस ठाकूर यांची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक करत विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

शैक्षणिक क्षेत्रात समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविण्याचा आगरी समाज संस्थेचा हा प्रयत्न विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिशादर्शक ठरणारा असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. अशाच प्रकारचे परीक्षा व शैक्षणिक मार्गदर्शन कार्यक्रम पुढील काळात तालुक्यातील ग्रामीण भागातील इतर शाळांमध्येही राबविण्यात येणार असल्याचे संस्थेने यावेळी जाहीर केले.



# पराडे शाळेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी परिसरातील महिला उद्योग मंडळाची प्राथमिक शाळा पराडे या शाळेच्या नवीन इमारतीचा उद्घाटन सोमवारी (दि.२) रोजी पार पडला. इमारतीचे बांधकाम अतिशय सुंदर मोठे प्रशस्त वर्ग सर्व सुविधांनी असे तयार झाले आहेत. पटसंख्या जास्त असल्याकारणाने इयत्ता ५वी ते ८ वीचे वर्ग सकाळ सत्रात व १ ली ते ४ थीचे वर्ग दुपार सत्रात भरविण्याचा शुभारंभ याच दिवसापासून करण्यात आला. याप्रसंगी नवे पर्व नवी सुरुवात, करू आम्ही उज्वल भविष्याची बात हा नारा देत विद्यार्थ्यांचा आनंद ओसांडून वाहत होता. याप्रसंगी उमा मुंढे, राकेश खराडे, जनार्दन मालुसरे, प्रशांत तांबोळी, मलेश गुडसे, संजीवनी शाळेच्या संचालिका सावळेकर, सहस्त्रबुद्ध, सरोजिनी साजवान, सुनंदा कुलकर्णी, शारदा दराडे, हर्षदा पालव, शोभा देऊळगावकर, महादेव पाटील तसेच सर्व शिक्षक वृंद उपस्थितीत होते.

# खालापूरातील १७ ग्रामपंचायतींची उत्कृष्ट कामगिरी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्याने राज्यस्तरीय (Performance -ssessment Index) उपक्रमात उल्लेखनीय यश संपादन केले असून तालुक्यातील तब्बल १७ ग्रामपंचायतींनी उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात टॉप शंभरमध्ये स्थान मिळवले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विशाल तनपुरे व गटविकास अधिकारी संदीप कराड, विस्तार अधिकारी पंचायत शैलेंद्र तांडेल व विनोद चांदोरकर यांच्यामुळे शक्य झाले.

गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी ग्रामसेवक, सरपंच, सदस्य व पंचायत कर्मचाऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करून नियोजनबद्ध कामकाजावर भर दिला. तसेच ऑनलाईन नोंदी, वेळेत अहवाल सादरीकरण व योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. या यशाबद्दल तालुक्यातील ग्रामपंचायती खरिवली, शिरवली, नावंढे, दुरशेत, जांबरुंग, नडोदे, चौक, तांबाटी, चावणी, चांभार्ली, साजगाव, टेंभरी, लोधिवली, वडगाव, उंबरे, गोरठण बुद्रुक व माडप ग्रामपंचायतीचे सर्वत्र कौतुक होत असून, खालापूर तालुक्याचा प्रशासनिक कार्यक्षमतेचा आदर्श इतर तालुक्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# घर जळून आर्थिक नुकसान

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील बोनशेत गावात श्याम फडके व रुपेश फडके यांच्या घराला रविवारी रात्री आग लागून मोठी दुर्घटना घडली. या आगीत घरातील सर्व साहित्य पूर्णतः जळून खाक झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही; मात्र कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे. ग्रामस्थांनीही तत्काळ मदतीसाठी पुढाकार घेतला. ही घटना पनवेल तालुका परिसरात हळहळ व्यक्त करणारी ठरली आहे.

# अंजप येथे कॅन्सर तपासणी शिबीर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील अंजप येथे माघी गणेशोत्सव मंडळाच्या वतीने महिलांसाठी कॅन्सर शिबीर आयोजित करण्यात आले होते. सार्वजनिक आरोग्य विभाग रायगड, श्री गणेश प्रतिष्ठान आंजप व लाईट आफ लाईफ ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. तालुक्यातील अंजप येथे सार्वजनिक आरोग्य विभाग रायगड, श्री गणेश प्रतिष्ठान अंजप आणि लाईट आफ लाईफ ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने असंसर्गजन्य आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत मुख, स्तन, गर्भाशय मुख यांच्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कॅन्सर तपासणी व्हॅन मार्फत तपासणी शिबिर घेण्यात आले.




डॉ. आनंद गोसावी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ नितीन गुरव आणि वैद्यकीय अधिकारी डॉ पावरा आणि डॉ कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर मोहीम राबविण्यात आली. अभियानात डॉ. अश्विनी सोनावळे, डॉ गणेश मेंगाळ, डॉ नेहा सोनावळे, डॉ रूपेश सोनावळे, महाले, स्मिता, नम्रता देशमुख, अंजना भोईर, विजया जाधव, मीना लोभी, तसेच वेहले, भुंडेरे यांनी कामकाज पाहिले. शिबीर यशस्वी होण्यासाठी श्री गणेश प्रतिष्ठान मंडळचे पदाधिकारी हरिश्चंद्र मिणमिणे, संजय मिणमिणे, गायकर आदी उपस्थित होते. कॅन्सरचे लवकर निदान व्हावे यासाठी कर्करोगावर नियंत्रण मिळावे म्हणून हे शिबीर ठेवण्यात आले होते. शिबिरात ९० लाभार्थींची तपासणी केली गेली.

# माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नेहुली-खंडाळे येथील को ए सो माध्यमिक शाळेच्या सन १९९२ साली इयत्ता १० वि या वर्गात शिकणाऱ्या माजी विद्यर्थी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा नुकताच बेलकडे येथिल पोसायडन्स रिसॉर्टला पार पडला. माजी विद्यर्थी आणि त्यांना त्यावेळी शिकविणारे शिक्षक जवळजवळ ३४ वर्षानंतर पुन्हा एकदा एकत्र आले होते.

यावेळी शाळेतील तत्कालीन शिक्षक एस. के. म्हात्रे, कुंदा ठाकूर,




रवींद्र ठाकूर आणि कुंभार तसेच माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.यावेळी अनेकांनी जुन्या आठवणींना उजाळा देत १९९२ पासून १९२६ पर्यंतचा प्रवास सांगितला.

शाळेतील जुने दिवस जुन्या आठवणी असे एक एक क्षण त्यांच्या डोळ्यासमोर उभे राहिले होते. प्रत्येकानी आपल्या मनोगतात शिक्षकांबद्दल कृतघ्नता व्यक्त केली. संतोष पाटील यांच्या गायनाचा कार्यक्रमात सादर केला.

याप्रसंगी सतीश समुद्रे, प्रसाद पाटील, समीर मालोदे, संजय वेंगुर्लेकर, बंटी चव्हाण, महेश घरत, सुनील समुद्रे, राजश्री दाबके, कांचन पाटील, शैलेश पेडणेकर, प्रसाद नाईक यांच्यासह अनेक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश पाटील याने केले.

# चिंचवलीतून मायलेक बेपत्ता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील चिंचवली गोविंदनगर येथील एक २७ वर्षीय महिला आपल्या तीन वर्षांच्या मुलाला घेऊन कोणास काही एक न सांगता घरातून निघून गेली ती अद्याप परत आलेली नाही. त्यामुळे पनवेल तालुका पोलीस ठाण्यात ती बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

शुभांगी सचिन पैठणे असे बेपत्ता महिलेचे नाव असून तिची उंची पाच फूट, नाक नकटे, केस लांब, डोळे काळे, बांधा मध्यम आहे. तिने अंगान कुडता व पायजमा घातलेला आहे. तर तिचा मुलगा कार्तिक तीन वर्षांचा असून त्याची उंची तीन फुट, नाक नेटके, केस बारीक, डोळे काळे, बांधा मध्यम आहे. त्याने अंगात भगवा टी शर्ट व काळी हाफ पॅन्ट घातली आहे.

ही महिला व मुलगा कोणास दिसल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पुरोगामी महाराष्ट्राला लागलेली सामाजिक कीड | उरणमधील सामाजिक संस्थांनी केली चिंता व्यक्त

# लग्नाच्या बाजारात हुंड्याचा लिलाव

**। उरण । प्रतिनिधी ।**

भारतीय संस्कृतीत विवाह पवित्र संस्कार मानला जातो. लग्न म्हणजे दोन मनांचे पवित्र बंधन असायला हवे; लग्न म्हणजे दोन पवित्र आत्म्याचे मिलन. मात्र, आज संपूर्ण महाराष्ट्रात लग्नाच्या नावाखाली हुंड्याच्या बोलीचा बाजार भरलेला दिसतो. जनावरांच्या बाजाराप्रमाणे मुलांची किंमत ठरवली जाते आणि मुलींचा अप्रत्यक्ष लिलाव केला जातो, ही बाब अत्यंत विदारक आणि समाजाच्या अपयशाचे द्योतक आहे. हुंडा हा दोन अक्षरी शब्द आजही सुशिक्षित, सुसंस्कृत म्हणवणाऱ्या समाजाला पोखरत आहे. हुंडा देणे किंवा घेणे हा कायद्याने गुन्हा असतानाही प्रत्यक्षात हा कायदा केवळ कागदावरच असल्याचे चित्र आहे. देशात एखादा टक्का विवाह वगळता उर्वरित बहुतेक विवाह हुंड्याच्या सर्रास देवाण-घेवाणीने होत आहेत. मात्र एवढ्या उघडपणे हा बेकायदा व्यवहार होत असूनही आजपर्यंत हुंडा दिला किंवा घेतल्याचा ठोस गुन्हा क्वचितच नोंदवला गेला आहे. आजवर एकही तथाकथित ङ्गहुंडापतीफ तुरुंगात गेला नसल्याचे वास्तव चिंताजनक आहे. नोकरदार, डॉक्टर, अभियंते, प्राध्यापक आणि सरकारी कर्मचारी या तथाकथित उच्चशिक्षित वर्गातही हुंड्याचे दर वाढताना दिसतात. मी माझ्या मुलीला हुंडा दिला, त्यामुळे माझ्या मुलासाठी हुंडा घेणारचफ हा जणू अलिखित नियमच समाजात रूढ झाला आहे. बदल स्वतःपासून सुरू करावा, असे सांगणारा समाज प्रत्यक्षात निर्णय घेण्याच्या वेळी मागे हटताना दिसतो.हुंड्याच्या मागण्या पूर्ण न झाल्यास नवविवाहितेचा मानसिक, शारीरिक छळ केला जातो. सुरुवातीचे काही दिवस सगळे सुरळीत वाटते; मात्र नंतर खरा छळ सुरू होतो. यातून अनेक महिलांना आत्महत्येस प्रवृत्त केले जाते. आपण महाराष्ट्राला पुरोगामी म्हणतो; मात्र हुंड्याच्या बाबतीत महाराष्ट्रही अपवाद नाही, हे विदारक वास्तव आहे.

या बाबत उरणमधील विविध सामाजिक संस्था संघटनानी चिंता व्यक्त केली आहे. जागतिक बँकेच्या २०२१ मधील अभ्यासानुसार भारतात लग्नात वधूपक्ष वरपक्षापेक्षा सातपट अधिक खर्च करतो. १९६० ते २००८ या काळातील ४० हजार लग्नांच्या अभ्यासातून ९५ टक्के लग्नांत हुंडा दिला गेल्याचे स्पष्ट झाले आहे, जरी १९६१ पासून हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असला तरी.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या क्राइम इन महाराष्ट्र अहवालानुसार दर तासाला एक नववधू हुंडाबळी ठरते. दररोज पाच महिला हुंड्याच्या छळाला कंटाळून आत्महत्या करतात, तर आठवड्याला किमान तीन महिलांच्या हत्येचा प्रयत्न होतो. कर्जबाजारीपणा, गरिबी, हुंड्यामुळे खोळंबलेलं लग्न आणि समाजाच्या रूढी या साऱ्यांचा बळी आज अनेक स्त्रिया ठरत आहेत ही एक घटना नसून समाजाचं आरसप्रतिबिंब आहे. या समस्येवर तोडगा काढण्याची क्षमता सामाजिक व राजकीय नेतृत्वाकडेच आहे. कायद्याची कडक अंमलबजावणी, हुंडाबळी प्रकरणात अजामीनपात्र गुन्ह्यांची तरतूद आणि आत्महत्येला सदोष मनुष्यवध मानण्यासारखे बदल काळाची गरज आहेत.

### मानसिकतेत बदल होण्याची गरज

बदलाची सुरुवात समाजाने आणि विशेषतः तरुणींनी ठाम निर्णय घेऊनच करावी लागेल.हुंडा घेणाऱ्या किंवा अवास्तव मागण्या करणाऱ्या कुटुंबाशी लग्न न करण्याचा निर्णय घेतल्याशिवाय हे चित्र बदलणार नाही. त्यासाठी समाजाच्या मानसिकतेत बदल होण्याची गरज आहे. मी हुंडा घेणार नाही व कोणाला घेऊ देणार नाही असा संकल्प आजच्या तरुणांनी केला व त्या प्रमाणे आचरण केल्यास हुंडा प्रथा नक्कीच बंद होईल यात संशय नाही.

## निवडक



### दगड ठेऊन रस्ता अडवल्याने संताप

**उरण :** उरण तालुक्यातील खोपटे येथील गावाच्या वेशीवर असलेल्या रस्त्यामध्ये मोठमोठे दगड ठेऊन येथील पोलीस पाटील पदावर कार्यरत असलेल्या रंगानाथ पाटील यांनी रस्ता अडवल्याने या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या अनेक वाहनचालक व पादचाऱ्यांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. येथील बांधपाडा ग्रामपंचायतीकडे ग्रामस्थांनी अनेकदा तक्रारी करूनही सदर रस्त्यावर आकसाने दगड ठेऊन रस्ता अडवल्याने संपूर्ण गावातील ग्रामस्थ व महिला संताप व्यक्त करीत आहेत. गावचे पोलीस पाटीलच गावचा रस्ता अडवीत असतील तर त्यांना पोलीस पाटील पदावर राहण्याचा अधिकारच उरत नसल्याचे येथील ग्रामस्थ म्हणत आहेत. तर रस्त्यातील दगड न काढल्यास येथील ग्रामस्थ या रस्ता अडवीणाऱ्या पोलीस पाटलाच्या विरोधात जनआंदोलन उभारण्याचा इशारा येथील ज्येष्ठ नागरिक विनायक पाटील यांनी ग्रामस्थांच्या वतीने दिला आहे.

### ‘अनिष्ट रुढी परंपरांना मुठमाती द्या’


**चिरनेर :** समाजातील अज्ञान, अंधकार, जुन्या अनिष्ठ रुढी परंपरा, अंधश्रद्धा यांना मूठमाती मिळावी आणि समाजाने तर्कशुद्धते बरोबच वैज्ञानिक दृष्टीकोनाची कास धरावी यासाठी प्रा. एल बी पाटील आपल्या पुरोगामी विचारांचा प्रचार करत आहेत. त्यांच्या या विचारास आज एका चित्रपटाच्या माध्यमातून फार मोठे व्यासपीठ मिळत आहे. ही खरोखरच आनंदाची व अभिमानाची बाब आहे. दरम्यान पाटील यांनी कविता, नाटक आणि साहित्याच्या माध्यमातून नेहमीच आसूड ओढलेले आहेत. पतीच्या मृत्यू नंतर पत्नीचे सौभाग्य अलंकार काढून घेतले जातात. त्यामुळे समाजात तिला अभिमानाने जगात येत नाही. या दुष्ट अनिष्ट रुढी परंपरेत कुठे तरी बदल व्हावा आणि तिला सन्मानाची वागणूक मिळाली यास्तव पाटील यांनी गेली अनेक वर्षे समाज प्रबोधन केलेले आहे. पाटील यांच्या याच विचारास आज चित्रपटाच्या माध्यमातून फार मोठे व्यासपीठ मिळत आहे. ही खरोखरच आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.

### मोटारसायकलच्या धडकेत पादचारी जखमी

**पनवेल :** मोटारसायकलने दिलेल्या धडकेत चाळीस वर्षीय पादचारी जखमी झाल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. संदीप पालवे असे या जखमी पादचाऱ्याचे नाव असून ते वरप, कल्याण येथे राहतात. संदीप पालवे हे जेडब्ल्यूआर कंपनीच्या समोरील पनवेल-जेएनपीटीकडे जाणाऱ्या महामार्गाच्या सेवा रस्त्यावर उभे होते. यावेळी जेएनपीटीकडून पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव दुचाकी चालकाने संदीप पालवे यांना जोराची धडक दिली. या धडकेत संदीप पालवे यांच्या छातीला आणि उजव्या पायाला दुखापत होऊन ते गंभीर जखमी झाली. त्यानंतर संदीप पालवे यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात जान दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पनवेल पोलिसांनी दुचाकी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांनी सुरी केला असल्याचे सांगण्यात आले आहे.

### गोडसईत उर्सचे आयोजन

**नागोठणे :** नागोठण्याजवळील पाटणसई ग्रामपंचायत हद्दीतील गोडसई येथे दरवर्षी प्रमाणे हजरत सय्यद बालेपीर शाहबाबा यांचा उर्सचे आयोजन गुरुवारी (दि.५) फेब्रुवारीला करण्यात आले आहे. या दिवशी संध्याकाळी संदल मिरवणूक काढण्यात येणार आहे. तर दरवर्षी दुसऱ्या दिवशी होणारा कववलीचा सामना निवडणुकीमुळे पुढे ढकलण्यात आला असून निवडणुकीनंतर हा कव्वालीचा सामना होणार असल्याची माहिती या कार्यक्रमाचे आयोजक दिलावरभाई मांडलेकर व अलिमभाई मांडलेकर यांनी दिली. या ६२ व्या उर्स उत्सवात मिठाईच्या दुकानांसह, विविध प्रकारची खेळण्यांची दुकाने, आकाश पाळणे, लहान मुलांसाठी इतर खेळाचे साहित्य या ऊर्समध्ये ठेवण्यात येत असतात. त्यामुळे परिसरातील सर्व नागरिकांनी, मुलांनी यामध्ये सहभाग घेऊन उर्सची शोभा वाढवावी असे आवाहन दर्गाचे तत्कालीन पुजारी लियाकतबाबा मांडलेकर यांचे पुत्र दिलावर मांडलेकर व अलिम मांडलेकर यांनी केले आहे. गोडसई येथील उर्स उत्सव यशस्वी करण्यासाठी दिलावरभाई मांडलेकर, अलिमभाई मांडलेकर, जहुर मांडलेकर, सदानंद गायकर, लियाकतशेठ कडवेकर, दिलीप मोदी, सिराजभाई पानसरे, असिफ मुल्ला, तसऊर अधिकारी, गुलजार सिंदी, रऊफ कडवेकर, इकबाल सिंदी, मन्सूर मुजावर, मुजफ्फर कडवेकर, कदिर रिफाई, उमेर सांगडे, तुफिल कडवेकर आदींसह उर्स कमिटीचे गोडसई, वाकण, पाटणसई येथील पदाधिकारी व सर्व सदस्य मेहनत घेत आहेत.



## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- We are inviting for internship to graduate candidates for share market trading.Stipend will be paid. For interview call 9923750549
- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजेत. शिक्षणाची अट नाही. ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार- १२००० महिना, संपर्क : ९८२३५८५३२१
- कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- गावरान कोंबडीची (सोनाली) पिल्ले मिळतील. मु.पो.आक्षी, अलिबाग, संपर्क : ९२७०५९०६२३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-आंदोशी, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकत १. श्रीम. रुक्मीणी दत्तू पाटील, २.सौ.सरिता पांडूरंग ठाकूर, ३. सौ.नंदा सुनिल शिगवण, ४. सौ.भारती काशिनाथ सरणेकर, ५.सौ.मारीया सॅमसन क्रियाडो रा. आंदोशी, पो.मल्याण, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून,सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेला आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| आंदोशी, ता.अलिबाग जि. रायगड | १५९/१ | ००-७५-७० पो.ख.०-०८-६० एकूण ०-८४-३० | १०.०० |

सदर वर नमूद जमिन मिळकतीपैकी क्षेत्र ०-३२-०० हे. आर मिळकत नोटीसीचा विषय आहे.

सदर जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस भाडेपट्टा, फरोक्तखत, जाण्या-येण्याचे मार्ग लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ चौदा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक: ०२/०२/२०२६

सही /-
**(ॲड.वैभव वसंत पाटील )**
रा. नवेदर बेली, ता.अलिबाग जि. रायगड, मो. ९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड

क्रमांक/हक्कनोंद/अपिल क्र.४७३/२०२५

१ श्री. शंभू दयाल अग्रवाल — अपिलार्थी
रा.७०३/बी, ओम श्रद्धा अपार्टमेंट, डॉन बॉस्को हाईस्कूल समोर, बोरीवली, एच ओ मुंबई - ४०००९१

**विरुद्ध**

पांडुरंग मारुती हजारे मयत तर्फे वारस
१ श्री.कल्पेश अनंत भागवत
२ श्री.यज्ञेश अनंत भागवत
अ.क्र.१ व २ रा. पाल टॉवर, रुम नं. १०१,
एस टी स्टॅंडच्या जवळ, भिसेगाव, ता.कर्जत, जि.रायगड
गुलाब दत्तात्रेय हजारे मयत तर्फे वारस
मनोज दत्तात्रेय हजारे मयत तर्फे वारस
३ श्रीम.रोहिणी मनोज हजारे
४ श्री.प्रतिक मनोज हजारे
५ श्रीम.साक्षी मनोज हमारे
६ श्रीम.नेत्रा मनोज हजारे
अ.क्र. ३ ते ६ रा. प्रथमेश अपार्टमेंट, पाटील आळी,
पो.ता.कर्जत, जि.रायगड
७ श्री.किसनलाल अमरसिंग राठोड
रा.आग्रा रोड, ता.कल्याण, जि.ठाणे
८ श्री.राहूल श्रीकृष्ण धारप
९ श्री.मयुर प्रफुल्ल बक्षी
१० श्रीम.ज्योती मयुर बक्षी
११ श्री.किशोर बाबू आसवले
१२ मे.होमटाऊन डेव्हलपर्स द्वारा भागीदार — उत्तरार्थी
११/१ श्री. अब्दुल रशिद परिहार
११/२ श्री तारानाथ महलिंग शेट्टी
११/३ श्री. दामोदर जगन्नाथ साहू
११/४ श्री. जॉन ओस्वल्ड कॉर्डीऐरा
११/५ श्री. शीमशोन अब्राहम गालसुरकर
सर्व रा.प्रफुल्ल अपार्टमेंट, प्लॉट नं.१, टागोर रोड,
लक्ष्मी नारायण मंदिराच्या समोर, सांताक्रूझ पश्चिम, मुंबई ४०००५४
रा.फ्लॅट नं.५०९, डी एस सेंटर, विद्याविहार पश्चिम, मुंबई
१३ तहसिलदार खालापूर, जि. रायगड

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं. १८/अ/५ क्षेत्र ०-३६-०० हे.आर आकार ०.२०, १८/अ/१० क्षेत्र ०-६५-०० हे. आर. आकार ०.३३, १८/अ/१२ क्षेत्र ०-३७-०० हे. आर आकार ०.२२, १८/३/७ क्षेत्र ०-९६-०० हे. आर आकार ०.४१,२१/१/ब क्षेत्र ३९.३०.०० आर चौ. मी. आकार ५.१०, २१/१/अ/१ क्षेत्र ३६.००.०० आर चौ.मी. आकार आकार ७२.०, २१/१ अ/२ क्षेत्र ४.००.०० आर चौ.मी. आकार ०.०० या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी कर्जत यांचेकडील आरटीएस अपील क्र.२५/२०२१ दि. ०४/०७/२०२५ मधील आदेशाविरुद्ध अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये दि. १३/०२/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालय, खोली क्रमांक ३०७, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयन समोर, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे निश्चित करणेत आलेली आहे तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैररहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २/०२/२०२६

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग करीता**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी खालील वर्णन केलेली मिळकत खालील नमूद मिळकतीचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णनः जिल्हा-रायगड, तालुका-पेण, मौजे-तळेखार येथील जमिन मिळकत,

| भुमापन क्रमांक व उपविभाग | भुधारणा पद्धती | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार |
|---|---|---|---|
| १/२/अ | भोगवटादार वर्ग-२ | ०-७६-८० | ८.३७ |

वर नमुद मिळकत ही मालक नामदेव नथु ठाकूर, बबी (बाबीबाई) काथोर मोकल व देहूबाई महादेव मोकल (देवकी महादेव मोकल) रा.तळेखार, ता.पेण, जि.रायगड व इतर वारसांच्या मालकीची व वहिवाटीची, निर्वेध, प्रत्यक्ष ताबेकब्जातील अशी मिळकत आहे. सदर वर नमूद एकुण क्षेत्र ०-७६-८० हे.आर. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-४०-५० हे.आर.हि मिळकत विक्री करण्याबाबत आमच्या पक्षकाराबरोबर बोलणी होउन आमच्या पक्षकारांबरोबर बयाणा रक्कम देउन साठेकरार झालेला आहे.

तरी या मिळकतीबाबत इतर कोणाचाही साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, ताबाकब्जा, हक्क, दान, गहाण, फरोक्त, बक्षिसपत्र, चार्ज, लिज, इतर कोणतेही करार अथवा हक्क हितसंबंध असल्यास खालिल नमूद ॲडव्होकेट यांचेकडे १५ दिवसांत लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे पक्षकार सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील मागावून येणारी हरकत आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : ०३/०२/२०२६

**ॲड. जितेंद्र द.म्हात्रे**
बी.ए.एल्.एल्.एम्.
नोटरी (भारत सरकार)
कार्या-शॉप नं.४, डी विंग, समर्थ प्रसाद नगर,
राजू पोटे मार्ग, ता-पेण, जि-रायगड.
फोन नं. ९४२२०९४७७४

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे आदाड, ता.मुरुड, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन शेतजमिन मिळकत श्री.इब्राहीम इस्माईल नाखवाजी व श्री.अशरफ अली इस्माईल नाखवाजी, राहणार वाळवटी, पो. उसरोली, ता. मुरुड, जि. रायगड, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशया करार सदर मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. इब्राहीम इस्माईल नाखवाजी व श्री.अशरफ अली इस्माईल नाखवाजी, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वास कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| आदाड, ता.मुरुड. | ४४७ | १-२६-२० पो.ख. ०-०३-३० एकूण १-२९-५० | १५-९८ |

अलिबाग,
दिनांक : ०२/०२/२०२६.

सही /
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालय जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड

क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र. ४७४/२०२५

१ मे. होमटाऊन डेव्हलपर्स द्वारा भागीदार
१/१ श्री.अब्दुल रशिद परिहार
१/२ श्री.तारानाथ महलिंग शेट्टी
१/३ श्री.दामोदर जगन्नाथ साहू
१/४ श्री.जॉन ओस्वल्ड कॉर्डीऐरा
१/५ श्री.शीमशोन अब्राहम गालसुरकर — अपिलार्थी
सर्व रा. प्रफुल्ल अपार्टमेंट, प्लॉट नं.१, टागोर रोड,
लक्ष्मी नारायण मंदिराच्या समोर, सांताक्रुझ पश्चिम,
मुंबई- ४०० ०५४२
रा. प्लॉट नं. ५०९, डी एस सेंटर, विद्याविहार पश्चिम, मुंबई
२ श्री. किशोर बाबू आसवले
रा.धामणी, ता. कर्जत, जि. रायगड

विरुद्ध

पांडूरंग मारुती हजारे मयत तर्फे वारस
१ श्री. कल्पेश अनंत भागवत
२ श्री. यज्ञेश अनंत भागवत
अ. क्र. १ व २ रा. पाल टॉवर, रुम नं. १०१,
एस टी स्टॅंडच्या जवळ, भिसेंगाव, ता. कर्जत, जि. रायगड
गुलाब दत्तात्रेय हजारे मयत तर्फे वारस
मनोज दत्तात्रेय हजारे मयत तर्फे वारस
३ श्रीम. रोहिणी मनोज हजारे
४ श्री. प्रतिक मनोज हजारे
५ श्रीम. साक्षी मनोज हजारे — उत्तरार्थी
६ श्रीम. नेत्रा मनोज हजारे
अ.क्र. ३ ते ६ रा.प्रथमेश अपार्टमेंट, पाटील आळी,
पो.ता.कर्जत, जि.रायगड
७ श्री. किसनलाल अमरसिंग राठोड
रा.आग्रा रोड, ता.कल्याण, जि.ठाणे
८ श्री. राहूल श्रीकृष्ण धारप
९ श्री. मयुर प्रफुल्ल बक्षी
१० श्रीम. ज्योती मयुर बक्षी
११ तहसिलदार खालापूर

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं. १८/३/५ क्षेत्र ०-३६-०० हे. आर आकार ०.२०, १८/अ/१० क्षेत्र ०-६५-०० हे. आर. आकार ०.३३, १८/अ/१२ क्षेत्र ०-३७-०० हे.आर. आकार ०.२२, १८/३/७ क्षेत्र ०-९६-०० हे. आर आकार ०.४१, २१/१/ब क्षेत्र ३९.३०.०० आर चौ. मी. आकार ५.१०, २१/१/अ/१ क्षेत्र ३६.००.०० आर चौ. मी. आकार आकार ७२.०, २१/१अ/२ क्षेत्र ४.००.०० आर चौ. मी. आकार ०.०० या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी कर्जत यांचेकडील आरटीएस अपील क्र. २५/२०२१, दि.०४/०७/२०२५ मधील आदेशाविरुद्ध अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये दि. १३/०२/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालय, खोली क्रमांक ३०७, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयन समोर, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे निश्चित करणेत आलेली आहे तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैररहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक: २/०२/२०२६

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग करीता**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री.विशांत विजयराव चंद्रावार रा. डी ७०२, सातवा मजला, सुयश पार्क, प्लॉट नं. १२३/१२५, सेक्टर २३, उलवे, ४१०२०६. यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :- मौजे-चांधई, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|
| ७१ | १ | ०-५४-६० | २ | ८७ |
| ७७ | ६ | ०-०७-०० | ० | १६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालिका शेजारी,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. निलेश दामु मुंढे**
दिनांक : ०३/०२/२०२६
मो. नं. ८४४६८६९६७१
ई मेल: nileshmundhe029@gmail.com

दिनांक : ०१ फेब्रुवारी २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - पोटल, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| अभिजीत परशुराम म्हात्रे गुलशन अशोक म्हात्रे | १३ | १/ब | ०-४८-८० | २ | ५९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- ०१/०२/२०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-आडीवली, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| तनाजी अमृता वांजळे शिवाजी अमृता वांजळे | १० | १ | १-२४-२० पो. ख ०-०५-३० एकुण १-२९-५० गुंठे क्षेत्रापैकी ०-६४-०० गुंठे क्षेत्र मिळकत | १०-२८ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०२/०२/२०२६

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता.घर क्र.३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड,
मो.९५९५२११८६७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बलिवरे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३०/७ | एकूण क्षेत्र १-८७-०० हे.आर.या पैकी नामदेव कृष्णा फोपे याचे खाते क्र.९५ ज्याचे एकूण क्षेत्र १-०७-०० हे.आर या मिळकतीबाबत. | ०.९७ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ०३/०२/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे आडीवली, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| सुनिता दामोदर वांजळे दिपा श्रीकृष्णा हाडप किरण दामोदर वांजळे समीर दामोदर वांजळे सुहास दामोदर वांजळे | १२ | ४/अ | ०-४१-४० पो. ख ०-०५-१० एकुण ०-४६-५० गुंठे क्षेत्र मिळकत | ०-५८ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०२/०२/२०२६

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता घर क्र.३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड,
मो. ९५९५२११८६७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे आवास, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ४७०/२, क्षेत्र ०-१७-०० हे.आर., पो.ख. ०-०२-०० हे. आर., एकूण क्षेत्र ०-१९-०० हे. आर., आकार ४.६१ रू. पै. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक रणजीत प्रभाकर राणे रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह अदलाबदल दस्ताने घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल अदलाबदल दस्त नोंदणीकृत करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०२/०२/२०२६

**(ॲड. संजय द.म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग
रूम नं. ५, युनियन बॅंकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नांदगाव, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १०२/१/अ | एकूण क्षेत्र ०-६४-२० हे.आर. | २.५४ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ०३/०२/२०२६

**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-आवास, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट नं. ४५२, क्षेत्र १-०१-१० हे. आर., पो.ख. ०-०२-३० हे. आर, एकूण क्षेत्र १-०३-४० हे. आर., आकार ५.८१ रू.पै. पैकी क्षेत्र ०-२१-०० हे.आर., ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक प्रकाश भालचंद्र रानडे व रमाकांत भालचंद्र रानडे दोघेही रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह अदलाबदल दस्ताने घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल अदलाबदल दस्त नोंदणीकृत करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०२/०२/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं. ५, युनियन बॅंकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस सदरच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे झिराड ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीमधील ०-०८-०० हे.आर. एवढे क्षेत्र व त्यामधील घर मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक निमेश जयंतीलाल शाह राहणार झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरच्या मिळकती निर्वेध व बोजाविरहीत असल्याची खात्री विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| झिराड ता.अलिबाग, जि.रायगड | ४०४/२ | ०-२७-०० | २.२३ |

**वर नमुद मिळकतींपैकी ०-०८-०० हे. आर एवढे क्षेत्र व त्यामधील ग्रुप ग्रामपंचायत मालमत्ता क्र.१४४७ क्षेत्र २३४० चौ. फुट ही आरसीसी पद्धतीची इमारत**

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.


अलिबाग,
दि. ३.०२.२०२६

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९८९००७९३०२

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# निवडक

## अल्काराज ऑस्ट्रेलियन ओपनचा विजेता

**सिडनी :** ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेला रविवारी (१ फेब्रुवारी) नवा विजेता मिळाला आहे. रविवारी ऑस्ट्रेलियन ओपन २०२६ स्पर्धेतील पुरुष एकेरीचे विजेतेपद स्पेनच्या २२ वर्षीय कार्लोस अल्काराजने दिग्गज नोवाक जोकोविचला पराभूत करत मिळवले आहे. हे त्याचे एकूण सातवे ग्रँडस्लॅम विजेतेपद असले, तरी पहिलेच ऑस्ट्रेलियन ओपनचे विजेतेपद आहे. त्यामुळे त्याने पहिल्यांदाच करियर ग्रँडस्लॅमही पूर्ण केले आहे. ज्यावेळी चारही ग्रँडस्लॅम स्पर्धा कारकिर्दीत जिंकल्या जातात त्याला करियर ग्रँडस्लॅम म्हटलं जातं. अल्काराजने फ्रेंच ओपन (२०२४, २०२५), विम्बल्डन (२०२३, २०२४) आणि अमेरिकन ओपन (२०२२, २०२५) या ग्रँडस्लॅम स्पर्धा प्रत्येकी दोनदा जिंकल्या आहेत. पण ऑस्ट्रेलियन ओपनही आता त्याने जिंकल्याने तो ओपन एरामधील करियर ग्रँडस्लॅम पूर्ण करणारा सर्वात युवा खेळाडू ठरला आहे. तसेच पुरुष एकेरीत करियर ग्रँडस्लॅम पूर्ण करणारा सहावाच खेळाडू ठरला. यापूर्वी रॉड लेव्हर, आंद्रे अगासी, रॉजर फेडरर, राफेल नदाल आणि नोवाक जोकोविच यांनीच असा कारनामा केला आहे. अव्वल मानांकित अल्काराजने ३८ वर्षीय जोकोविचला रविवारी अंतिम सामन्यात २-६, ६-२, ६-३, ७-५ अशा चार सेटमध्ये पराभूत केले. त्यामुळे जोकोविचची २५ व्या ग्रँडस्लॅमची प्रतिक्षा अद्यापही कायम राहिली. हा अंतिम सामना तीन तास दोन मिनिटे चालला. या सामन्यासाठी स्पेनचा दिग्गज टेनिसपटू राफेल नदालही उपस्थित होता.या अंतिम सामन्यात जोकोविचने सुरुवात चांगली केली होती. त्याने पहिल्याच सेटमध्ये अल्काराजवर वर्चस्व ठेवत विजय मिळवला होता.

## अंकिता रैनाची विजयी सलामी

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या वतीने आयोजित मुंबई ओपन डब्ल्यूटीए १ लाख २५ हजार डॉलर महिला टेनिस स्पर्धेत पात्रता फेरीच्या पहिल्या चरणात भारताच्या अंकिता रैनाने आकांक्षा नित्तुरेचा पराभव करून वर्चस्व गाजवले. तर, क्रिस्टिना सिडोरोव्हा, कुलिकोव्हा एनास्तेसिया, झुजाना पावलीकोव्स्का, मात्सुदा मिसाकी, निकोल फोस्सा हुएर्गो, पेंगतारण प्लिपुच, यास्मि कब्बाज यांनी विजयी सलामी दिली. मुंबई येथील एम एसएलटीएच्या टेनिस कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्या पात्रता फेरीत रशियाच्या क्रिस्टिना सिडोरोव्हा हिने २६ वर्षीय झील देसाईचा ६-२, ६-० असा सहज पराभव केला. सामन्यात १९ वर्षीय क्रिस्टिना हिने सुरुवातीपासूनचा आक्रमक खेळ करत झीलला सूर गवसण्याची फारशी संधी दिली नाही.फिनलंडच्या कुलिकोव्हा एनास्तेसियाने नाओको इटोचा ६-०, ६-० असा एकतर्फी पराभव केला. १५ वर्षीय युवा खेळाडू पार्थसारथी मुंढेला झुजाना पावलीकोव्स्का कडून ७-६, २-६, ३-६ असा पराभव पत्करावा लागला. पहिल्या सेटमध्ये मुंढेने झुजानाला कडवी झुंज दिली. पण त्यानंतर झुजानाने पुढील दोन्ही सेट जिंकून विजय मिळवला. पाचव्या मानांकित मात्सुदा मिसाकी हिने भारताच्या सौम्या विजचे आव्हान ६-०, ६-१ असे मोडीत काढले. २७ वर्षीय मात्सुदाने बेसलाईन वरून सुरेख खेळ करत सौम्या विरुद्ध विजय मिळवला.

## यशस्वी जैस्वाल संघात परतला

**नवी दिल्ली :** भारताच्या ट्वेंटी-२० वर्ल्ड कप संघात स्थान न मिळालेल्या यशस्वी जैस्वालचे मुंबईच्या रणजी करंडक स्पर्धेतील संघात पुनरागमन झाले आहे. यशस्वीने मागील सामन्यात न खेळण्याची इच्छा व्यक्त केली होती, परंतु तो उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत मुंबईच्या संघात परतला आहे. दुखापतीतून सावरत शार्दूल ठाकूरही परतला असून तो कर्नाटकविरुद्धच्या लढतीत नेतृत्व करणार आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनने सोमवारी १६ सदस्यीय संघ जाहीर केला. मुंबईने एलिट ड गटात अव्वल स्थान पटकावून उपांत्यपूर्व फेरीतील स्थान पक्के केले. साखळी फेरीतील शेवटच्या सामन्यात त्यांनी दिल्लीविरुद्ध पहिल्या डावातील आघाडीच्या जोरावर जास्तीचे गुण खिशात टाकले. दिल्लीच्या पहिल्या डावातील २२१ धावांच्या प्रत्युत्तरात मुंबईने ३१७ धावा चोपल्या होत्या. दिल्लीने दुसरा डाव ६ बाद ४०७ धावांवर घोषित केला अन् सामना ड्रॉ राखला. पण, पहिल्या डावात आघाडी घेणाऱ्या मुंबईचा फायदा झाला. मुंबईने ड गटात ७ सामन्यांत ४ विजय मिळवले, तर ३ सामने ड्रॉ राखले. २ बोनस गुणांसह त्यांनी ३३ गुणांची कमाई केली. उपांत्यपूर्व फेरीत त्यांच्यासमोर ब गटातून दुसरे स्थान पटकावणाऱ्या कर्नाटकचे आव्हान आहे. कर्नाटकने ७ सामन्यांत ३ विजय मिळवले असून एकामध्ये त्यांची हार झाली. तेच ३ सामने ड्रॉ राखण्यात त्यांना यश आले. २७ गुणांसह ते उपांत्यपूर्व फेरीत पोहोचले आहेत. देवदत्त पडिक्कलच्या नेतृत्वाखाली हा संघ उपांत्यपूर्व फेरीचा सामना खेळेल, तर मुंबई शार्दूलच्या नेतृत्वाखाली विजयी घोडदौड कायम राखण्यास उतरेल. ६ फेब्रुवारीला हा सामना सुरू होणार आहे आणि बाद फेरी असल्याने पाच दिवसाची लढत असेल.यशस्वीने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ४९ सामन्यांत ५६.११ च्या सरासरीने ४८२६ धावा केल्या आहेत. त्यात १७ शतकं व १८ अर्धशतकांचा समावेश आहे.

---

## अंडर १९ विश्वचषक स्पर्धा; पाकिस्तानचा उडवला धुव्वा

# भारत उपांत्य फेरीत

| दुबई | वृत्तसंस्था |

**अंडर १९ विश्वचषक २०२६ मधील सुपर सिक्स सामन्यात भारताने पाकिस्तानचा ५८ धावांनी पराभव केला आहे. भारताच्या फिरकीपटूंनी पुन्हा एकदा सामन्याचा रोख बदलला. एका घडीला पाकिस्तान सामन्यात पुढे होता आणि विजयाचा जवळ होता. पण भारताच्या गोलंदाजांनी पुनरागमन करत विजय निश्चित केला. आयुषने ४२व्या षटकात मोमिनला झेलबाद करत साम न्यातील तिसरी विकेट मिळवली. आयुष फलंदाजीदरम्यान शून्यावर बाद झाला, पण गोलंदाजीत मात्र मॅचविनिंग योगदान दिलं आहे.**

खिलन पटलेच्या ४१व्या षटकात पाकिस्तानला सातवा धक्का बसला. अब्दुल सुभान मोठा फटका खेळायला गेला आणि कनिष्क बरंच अंतर धावत येत त्याने कमालीचा रनिंग झेल टिपला. यासह पाकिस्तानला आता ५४ चेंडूत ७० धावांची गरज आहे.विहान मल्होत्राने ३७व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर अली हसन बलोचला झेलबाद करत संघाला सहावी विकेट मिळवून दिली.आयुष म्हात्रेने ३६व्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर कमालीचा चेंडू टाकत ६६ धावा करत सेट केलेल्या उस्मानला पायचीत करत बाद केलं. यासह ३६ षटकांत पाकिस्तानने ५ बाद १६९ धावा केल्या.




पाकिस्तानविरूद्धचा सामना संपण्यापूर्वीच टीम इंडिया अंडर-१९ विश्वचषकाच्या सेमीफायनलमध्ये पोहोचली आहे. पाकिस्तान संघ भारताने दिलेलं २५२ धावांचं लक्ष्य ३३.३ षटकांत गाठण्यात अपयशी ठरल्याने टीम इंडिया पुढील फेरीत गेली आहे. आयुष म्हात्रे स्वत: ३२व्या षटकात गोलंदाजी करायला आला आणि पहिल्याच चेंडूवर त्याने संघाला विकेट मिळवून दिली. आयुषचा चेंडू हुसैनच्या बॅटची कड घेत अभिज्ञानच्या हातात गेला आणि तो झेलबाद झाला. आर एस अंबरीशने ३०व्या षटकात पाकिस्तानचा कर्णधार फरहान युसूफला माघारी धाडलं. यासह ३० षटकांत पाकिस्तानने ३ बाद १५३ धावा केल्या आहेत.

पाकिस्तानने दोन विकेट्स गमावल्यानंतर आता फरहान व उस्मान यांनी संघाचा डाव उचलून धरला आहे. या दोघांनीही अर्धशतकी भागीदारी केली आहे. तर आतापर्यंत २५ षटकांत संघाने २ बाद १२९ धावा केल्या आहेत.कनिष्क चौहान १७वं षटक टाकण्यासाठी आला आणि त्याने षटकातील अखेरच्या चेंडूवर पाकिस्तानची ६३ धावांची भागीदारी तोडत संघाला महत्त्वाची विकेट मिळवून दिली. कनिष्कच्या गोलंदाजीवर हमजा स्वीप शॉट खेळायला गेला पण चेंडू थेट स्टंपवर आदळल्याने क्लीन बोल्ड झाला.समीर मिन्हालसच्या विकेटनंतर हमजा व उस्मान यांनी संघाचा डाव सावरला आहे. दीपेश देवेंद्रनच्या नवव्या षटकात आरोन जॉर्जने उस्मानचा झेल सोडला. यासह पाकिस्तानने पॉवरप्लेमध्ये १ बाद ५६ धावा केल्या.

हेनिल पटेलची पहिल्या षटकाच चांगलीच धुलाई केली होती. स्पेलमधील पुढच्या षटकात समीर मिन्हासने चौकार खेचला होता. पण पुढच्या चेंडूवर हेनिलने कमालीचा चेंडू टाकत त्याला पायचीत केलं आणि संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला.भारताने दिलेल्या २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी पाकिस्तानकडून समीर मिन्हास व हमजा जहूर ही जोडी उतरली. समीरने पहिल्याच षटकात चौकार खेचला. तर हेनिल पटेलच्या दुसऱ्या षटकात हमजाने ३ चौकार लगावत १३ धावा कुटल्या. यासह २ षटकांत पाकिस्तानने १८ धावा केल्या. भारतीय संघ ४९.५ षटकांत सर्वबाद झाला. भारताकडून मधल्या फळीतील व खालच्या फळीतील फलंदाजांनी चांगली झुंज देत संघाला २५० धावांच्या पलीकडे नेला. वेदांत त्रिवेदीने सर्वाधिक ६८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्यानंतर विहान मल्होत्राने २१ धावांचं, अभिज्ञानने १६ धावांच तर अंबरिशने २९ धावांचं योगदान दिलं. तर अखेरच्या षटकांमध्ये खिलन पटेल व कनिष्क चौहान यांनी महत्त्वपूर्ण खेळी केल्या. खिलनने १५ चेंडूत २१ धावा केल्या. तर कनिष्कने २९ चेंडूत ४ चौकार व एका षटकारासह ३५ धावा केल्या.

सुभानच्या अखेरच्या षटकात भारताने दोन विकेट्स गमावल्या. खिलन मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात क्लीन बोल्ड झाला. तर कनिष्क मोठा फटका खेळताना झेलबाद झाला. तर एक धाव चोरण्याच्या प्रयत्नात भारत अखेरच्या षटकातील पाचव्या चेंडूवर सर्वबाद झाला. कनिष्क चौहान व खिलन पटेल यांनी अर्धशतकी भागीदारी रचत संघाला २५० धावांचा पल्ला गाठून दिला. अखेरच्या षटकांमध्ये दोघांनीही चौकार-षटकारांचा पाऊस पाडला.

---

## राष्ट्रीय व राज्यस्तरीय अंध क्रीडापटूंना क्रीडा साहित्याचे वाटप



| पुणे | वृत्तसंस्था |

शिवम फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने संस्थापिका श्रीमती पार्वतीबाई वामनराव रेणूसे यांच्या अठराव्या स्मृतिदिनानिमित्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय अंध क्रीडापटूंना क्रीडासाहित्याचे वाटप मोहन गोस्वामी, राजा टिकर, जयसिंगमोहिते यांच्या हस्ते, बसवराज संतीकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रकाश रेणूसे यांच्या अध्यक्षतेखाली पंडित, नेहरू स्टेडियम, पुणे येथे करण्यात आले.

सत्कारार्थी मुलींची नावे., आशा दुधवडे, सुनिता पावरा, सविता यमकर, सिध्दी खोचरे, सोनकांबळे, गायकवाड, निकिता भालेराव, सावित्री बांबले, अंजली निवाळे, अर्चना राठोड, अनिता नवगिरे, गौरी देशमुख, मुले, चंद्रकांत खराटे, दिनेश पाडाळे, प्रज्वल बिरे, ऋषिकेश राजमाने, समीर माने, संदीप जाधव, वैभव मांढरे. जमीर शेख यांनी स्वागत केले. क्रीडा संघटक सुनील नेवरेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

## इंग्लंडचा श्रीलंकेला दणका

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

श्रीलंकेविरुद्धच्या टी २० मालिकेतील दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ५ गडी गमवून १८९ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडला फक्त ७.२ षटकांचा खेळ झाला आणि थांबला. कारण पावसाने हजेरी लावल्याने सामन्यात खंड पडला. तेव्हा इंग्लंडने ७.२ षटकात २ गडी गमवून ५७ धावा केल्या होत्या.

पाऊस थांबला आणि सामन्याला पुन्हा सुरूवात झाली. पण यावेळी षटकं कमी करण्याचा निर्णय घेतला. तसेच नवं टार्गेट दिलं गेलं. १७ षटकात १६८ धावांचं टार्गेट दिलं गेलं. १६.४ षटकात दिलेलं आव्हान ४ गडी गमवून पूर्ण केलं.

## बाहे क्रिकेट स्पर्धा; उपविजेता भैरवी मालसई संघ

## गावदेवी धानकान्हे आदिवासी वाडी संघ विजेता



| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावातील गावदेवी क्रीडा मंडळ बाहे यांच्या वतीने संपन्न करण्यात आलेल्या विभागीय क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामन्यात गावदेवी धानकान्हे आदीवासीवाडी संघाने अंतिम सामन्यात सर्वोत्तम खेळ करून विजेतेपद पटकावले आहे.

क्रीडाप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद लाभलेल्या या स्पर्धेदरम्यान प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते अनंत थिटे, मराठी उद्योजक नारायण कान्हेकर, निलेश शेडगे, प्रफुल्ल वाळंज, सुनील थिटे, विजय नाकटे, संतोष थिटे, गणेश तु. पवार, रोशन मोरे, रुपेश बामुगडे, गणेश नंदू पवार, सचिन देवकर आदी उपस्थित होते. स्पर्धेतील उपविजेतेपदाचा मान भैरवी मालसई संघाला मिळाला.या स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज नरेश वाघमारे, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून ऋतिक पवार तर मालिकावीर. सुयोग आयरे यांना उपस्थित मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. स्पर्धेचे समालोचन चिपळूण येथील सिद्धेश इंदुलकर यांनी केले.तर स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी गावदेवी बाहे क्रीडा मंडळाचे सर्व सदस्य व क्रिकेट खेळाडू यांनी मोलाचे सहकार्य केले.

---

## पाकचा भारताच्या सामन्यांवर बहिष्कार

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

पाकिस्तान क्रिकेट संघ टी २० वर्ल्डकप स्पर्धेत भारताविरुद्ध होणाऱ्या लढतीवर बहिष्कार टाकणार आहे. पाकिस्तानने बांगलादेशला पाठिंबा देण्यासाठी स्पर्धेतून माघार घेण्याचे संकेत दिले होते. पाकिस्तानचा संघ काही तासात वर्ल्डकपसाठी रवाना होतो आहे. मात्र बहुचर्चित लढतीवर त्यांनी बहिष्कार टाकायचं पक्कं केलं आहे. पाकिस्तान सरकारच्या अधिकृत एक्स अकाऊंटवरून यासंदर्भात माहिती देण्यात आली. पाकिस्तान सरकारने क्रिकेट संघाला टी२० वर्ल्डकपमध्ये सहभागी होण्यास अनुमती दिली आहे. मात्र संघाने भारताविरुद्धचा सामना खेळू नये असं या पोस्टमध्ये लिहिलं आहे.

## आभा आंतरराष्ट्रीय ट्रॅक एशिया कपमध्ये चमकली

- **टीम स्प्रिंट प्रकारात पटकावले सुवर्णपदक**
- **वैयक्तिक २०० मीटर स्प्रिंटमध्ये रौप्यपदक**

| पनवेल | वार्ताहर |

खारघरमधील उदयोन्मुख सायकलपटू आभा सोमण हिने चेन्नई येथे २९ ते ३१ जानेवारी दरम्यान झालेल्या आंतरराष्ट्रीय ट्रॅक एशिया कप २०२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करून देशाचा अभिमान वाढवला आहे.

खारघर, पनवेल येथील १७ वर्षीय आभाने उत्कृष्ट जिद्द आणि वेग दाखवत भारताचे प्रतिनिधित्व केले. तिने टीम स्प्रिंट प्रकारात सुवर्णपदक, तर वैयक्तिक २०० मीटर स्प्रिंटमध्ये रौप्यपदक पटकावले.



आभा गेल्या तीन वर्षांपासून पुण्यातील फिनिक्स सायकलिंग ॲकॅडमीमध्ये प्रशिक्षक दर्शन बारगुजे यांच्या प्रशिक्षणखाली कठोर सराव करत आहे. या आंतरराष्ट्रीय यशापूर्वी तिने विविध राष्ट्रीय स्पर्धांमध्ये तिने १० राष्ट्रीय पदके जिंकून भारतीय ट्रॅक सायकलिंगमध्ये आपला ठसा उमटवला आहे.अलीकडेच चेन्नई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आभाने पुन्हा एकदा ट्रॅकवर आपली गुणवत्ता सिद्ध केली असून ती भारतातील आशादायक युवा सायकलपटूंमध्ये गणली जात आहे. तिच्या या यशामुळे नव्या पिढीतील अनेक इच्छुक खेळाडूंनाही प्रेरणा मिळत आहे.

आभाने जिल्ह्यातील नव्याने उदयास येणाऱ्या सायकलपटूंसमोर आदर्श ठेवत रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

## रसायनीतील संगिता पांगत पॉवरलिफ्टींग स्पर्धेत प्रथम

| रसायनी | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टींग असोसिएशन मुंबई, पॉवरलिफ्टींग स्पोर्ट्स असोसिएशन रायगड यांच्यावतीने जिल्हास्तरीय क्लासिक पॉवरलिफ्टींग स्पर्धेचे आयोजन नवीन पनवेल येथे करण्यात आले होते.यात महिला खुल्या गटात मास्टर वन मध्ये मोहोपाडा आळी आंबिवली येथील संगिता मिलिंद पांगत यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

संगिता पांगत यांच्या विशेष कामगिरीबद्दल त्यांना सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, राष्ट्रीय पंच संजय माधव, अनंत चाळके, संजय सरदेसाई, पॉवरलिफ्टींग जिल्हा अध्यक्ष गिरीश वेदक, पंकज



संगति, राजाराम गोळे, यशवंत म ोकल आदी मान्यवर उपस्थित होते. संगिता पांगत या शालांत तसेच परिसरातील महिलांना योगासनांचे प्रशिक्षण देतात. त्यांना विविध क्रीडा खेळात गौरविण्यात आले आहे. संगिता पांगत यांना पॉवरलिफ्टींग स्पर्धेत सुवर्णपदक मिळाल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

---

### शीतोरीयू कराटे डो चॅम्पियनशिप | देशसतील ७८७ खेळाडूंचा सहभाग

# रायगडच्या खेळाडूंचा स्पर्धेत डंका

| अलिबाग | प्रतिनिधी |

२६ वी शीतोरीयू कराटे डो चॅम्पियनशिप २०२६ बुडो फाउंडेशनने हि स्पर्धा आयोजित केली होती. १८ जानेवारी रोजी अलिबागमधील जिल्हा क्रीडा संकुल येथे संपन्न झाली.

यामध्ये इंडियन ओकिनावा शोरीन रियू क्युडोकान कराटे-डो इंडियाच्या विद्यार्थ्यांनी रायगड जिल्ह्याच्या संघाने सहभाग घेतला होता. या देशभरातील स्पर्धेत महाराष्ट्र सह ९ राज्य सहभागी झाले होत. त्यामध्ये दिल्ली, उत्तर प्रदेश, झारखंड, तामिळनाडू, तेलंगणा, केरळ, कर्नाटक, नागालँड आणि



राजस्थान इत्यादी राज्यातून खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या राष्ट्रीय स्पर्धेत विविध राज्यातून ७८७ हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

यामध्ये रायगड जिल्ह्यातून क्युडोकान कराटे-डोच्या मुरुड व अलिबाग तालुक्यातील खेळाडूंनी रायगड संघाचे प्रतिनिधित्व करून जिल्ह्याचे नाव उंचावले. त्यांनी कुमिते व काता अशा २ प्रकारात एकूण ५ सुवर्ण, ५ रौप्य व १३ कांस्य अशी एकूण २३ पदके जिंकून चमकदार कामगिरी केली.

सहभागी १७ खेळाडू अलिबाग तालुक्यातील संचालक मंडळ नागाव हायस्कूल, नागाव अलिबाग येथे प्रशिक्षण घेत आहेत. यामध्ये साजेरी पाटील १ रौप्यपदक, मितांश पाटील १ कांस्यपदक, त्रिशूल घरत १ सुवर्णपदक, अनन्या खामित्कर १ सुवर्णपदक, १ कांस्यपदक, पूर्वी नाईक १ सुवर्णपदक, १ कांस्यपदक, अनुश्री कवळे १ कांस्यपदक, मनोमय जाधव १ कांस्यपदक, चरण हरे १ सुवर्णपदक, १ कांस्यपदक, तृष्णा मयेकर १ रौप्यपदक, मेधांश पाटील, १ रौप्यपदक, १ कांस्यपदक, अर्चित वैद्य १ सुवर्ण पदक, १ रौप्यपदक, वीर गण १ रौप्यपदक, स्मित दांडेकर १ कांस्यपदक, दक्ष टिवळेकर १ कांस्यपदक, माही जाधव २ कांस्यपदक, मृणा मयेकर १ कांस्यपदक, कर्णेश नाईक १ कांस्यपदक पटकावले.

या सर्व विद्यार्थ्यांना कराटे प्रशिक्षक सिहान.अरुण बोडके तसेच रेंशी. अरविंद भोपी, सेंसाय. प्रसाद चौलकर यांचे मार्गदर्शन लाभले. सेंपाय राधा ढापरे, सेंपाय अनुश्री भोपी, सेंपाय वेद संजय पाटील आणि सेंपाय दुर्वा निलेश नाईक यांचे सहकार्य लाभले.

## दिल्ली चौथ्यांदा प्लेऑफमध्ये

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

जेमिमाह रॉड्रिग्स हीच्या नेतृत्वात दिल्ली कॅपिट्ल्सने डब्ल्यूपीएलच्या चौथ्या मोसमात प्लेऑफमध्ये धडक दिली आहे. दिल्ली कॅपिट्ल्सची जेमिमाहच्या नेतृत्वात वूमन्स प्रीमियर लीग स्पर्धेत प्लेऑफमध्ये पोहचण्याची पहिली तसेच एकूण आणि सलग चौथी वेळ ठरली.



दिल्लीने बडोद्यातील कोतांबी येथील बीसीए स्टेडियममध्ये झालेल्या या सामन्यात युपी वॉरियर्सजचा धुव्वा उडवला. युपीने दिल्लीसमोर विजयासाठी १२३ धावांचं माफक आव्हान ठेवलं होतं. दिल्लीने हे आव्हान ८ बॉलआधी ५ विकेट्सच्या मोबदल्यात पूर्ण केलं. दिल्लीने १८.४ ओव्हरमध्ये ५ विकेट्स गमावून १२६ धावा केल्या. दिल्लीने यासह प्लेऑफचं तिकीट मिळवलं. तर युपीच्या पराभवामुळे गतविजेत्या मुंबई इंडियन्सचं स्पर्धेतून पॅकअप झालं. युपीने हा सामना जिंकला असता तर मुंबई प्लेऑफमध्ये पोहचली असती. मात्र दिल्लीने स्वत:च्या जोरावर प्लेऑफमध्ये धडक दिली.

युपीसाठी दीप्ती शर्मा हीने सर्वाधिक २४ धावा केल्या. सिमरन शेख हीने २२ तर चार्ली क्नॉट हीने १२ धावांचं योगदान दिलं. तर अखेरच्या क्षणी शिखा पांडे हीने नाबाद २३ धावांचं योगदान दिलं. दिल्लीकडून मारिजान काप हीने सर्वाधिक ३ विकेट्स मिळवल्या. तर चिनले हेनरी आणि श्री चरणी या दोघींनी प्रत्येकी २-२ विकेट्स मिळवल्या.जेमिमाहने निर्णायक क्षणी १८ चेंडूत नाबाद ३४ धावा केल्या. जेमिने या खेळीत ५ चौकार लगावले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)